सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN
978-81-940842-0-4

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २२ • अंक ०१ • एप्रिल २०२६ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी




## विश्वासार्ह व्यावसायिकता सहकारात गरजेची – अनास्कर




## नागरी सहकारी बँकांनी आरबीआयच्या नियमांचे पालन करावे – सतीश मराठे

## 'लोकमान्य सोसायटी'चा पुणे विभागीय कार्यालयाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा






दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर
31 वर्ष विश्वासाचे
आपला परिवार, आपली संस्था !
जनमानसाचा
विश्वास...
धरमपेठ महिला!
५००० कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल...
तुमच्या सेवेत सदैव तत्पर !
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा
LIC /GIC पॉलिसी काढण्याची प्रीमियम भरण्याची व नुतनीकरणाची सुविधा
MSEDCL वीजबिल भरणा केंद्र
MOBILE BANKING
LOAN सेवा सुविधा
GOLD LOAN उपलब्ध
CORE BANKING
IRCTS आरक्षण सुविधा
सोने कर्ज Gold Loan
सोन्यासारख्या लेकींसाठी... हक्काचा आधार !
कमीतकमी
कागदपत्रे
त्वरित कर्जमंजुरी
गोल्ड लोन 0.90% व्याजदर प्रति माह
WE PROVIDE THE BEST OFFER
BUSINESS LOAN
Against mortgage of Immovable property
Interest 9%* to 12%*
Contact
9881144224
9822272947
मुख्य कार्यालय : प्लॉट नं ४२-अ, सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-४४००१०.
(0712)-2524336 / 2520303 info@dpmahila.com | Follow us on :
महाराष्ट्र | छत्तिसगढ | मध्यप्रदेश
www.dpmahila.com

# सस्नेह निमंत्रण

# 'बँकिंग साक्षरता' पुस्तक प्रकाशन सोहळा व 'बदलते बँकिंग' - परिसंवाद




सस्नेह नमस्कार,

सर्व प्रकारच्या बँका आणि पतसंस्थांमध्ये व्यवहार करतांना ग्राहकांनी घ्यावयाची काळजी, बदलत्या तंत्रज्ञानामुळे बँकिंगमध्ये होणारे बदल आणि आर्थिक फसवणूक टाळण्याच्यादृष्टीने करावयाच्या उपाययोजना तसेच बँकिंगमधील क्लिष्ट नियम सहजपणे समजावून सांगणारे

ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ

**श्री. गणेश रामचंद्र निमकर**

यांचे सोप्या मराठी भाषेतील पुस्तक वाचकांसमोर येत आहे.

## प्रकाशन शुभहस्ते

**कार्यक्रमाचे अध्यक्ष - मा. श्री. सतीशजी मराठे**
(संचालक, रिझर्व्ह बँक आणि नाबार्ड, संस्थापक सदस्य - सहकार भारती)

या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने **'बदलते बँकिंग'** या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.
या परिसंवादासाठी खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**मा. श्री. दीपक तावरे**
(सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य)

**मा. श्री. अनिल कवडे**
(आयुक्त, राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण)

**मा. डॉ. उदयराव जोशी**
(राष्ट्रीय अध्यक्ष, सहकार भारती)

**मा. श्री. मिलिंदजी काळे**
(उपाध्यक्ष, नॅफकॅब)

**मा. श्री. अजय ब्रह्मेचा**
(अध्यक्ष, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन)

**मा. श्री. ओमप्रकाश (काका) कोयटे**
(अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन)

**मा. श्री. विद्याधरजी अनास्कर**
(प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक)

**मा. श्री. विवेकजी जुगादे**
(महामंत्री, सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश)

**मा. श्री. राधेश्यामजी (भाईजी) चांडक**
(संस्थापक अध्यक्ष, बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी)

आपणांस विनंती आहे की, आपण या कार्यक्रमास अवश्य उपस्थित राहून या महत्वपूर्ण पुस्तकाच्या प्रचार-प्रसारासाठी आपला सहभाग नोंदवावा तसेच यानिमित्ताने होत असलेल्या विशेष परिसंवादाचा देखील अवश्य लाभ घ्यावा. धन्यवाद!

आपले स्वागतोत्सुक,

**भालचंद्र कुलकर्णी**
संपादक, सहकार सुगंध
(मो. : ९८२२८८२५०९)

**गणेश निमकर**
लेखक, ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ
(मो. : ९८२२५६८५५०)

Location

### कार्यक्रम

गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६, दुपारी ४ वाजता
स्थान - सहकार सभागृह, कॉसमॉस बँक,
मुख्य कार्यालय (दुसरा मजला), गणेशखिंड रोड, पुणे


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
sales@netwinindia.in
www.netwin.in


राजर्षी शाहू मल्टीस्टेट
र. नं. 819
१४ एप्रिल
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
जयंती निमित्त
१९ एप्रिल
अक्षय तृतीया
निमित्त
सर्वांना मंगलमय हार्दिक शुभेच्छा...!
शुभ अक्षय तृतीया
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
संदीप शेळके
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. २००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था.
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ७५ हजार महिलांना २५० कोटी रुपयांचे कर्ज वाटप.
६. १०५ कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
SMS अलर्ट
DOORSTEP बँकिंग
MOBILE बँकिंग
DEPOSITE सुविधा
LOAN सुविधा
CORE बँकिंग
NET बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था, FCBA पुरस्कार प्राप्त संस्था,
मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
सौ.मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
को. ऑफ क्रेडीट सोसा. मर्या. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
9359941853



टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
तुमचं नाव, तुमचं घर
टीजेएसबी
गृह कर्ज कायम
तुमच्यासोबत!
₹3 कोटींपर्यंत*
आकर्षक व्याजदर
*अटी लागू
www.tjsb.bank.in | : 022-48897210

|| बिना संस्कार नहीं सहकार ।
बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**एप्रिल २०२६ (वर्ष २२, अंक ०१)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**वर्गणीचे दर**

**वार्षिक वर्गणी : रु. ७००/– फक्त**
**त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/– फक्त**
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**QR कोड**

**कृपया QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे. किंवा खालील बँक खात्यात थेट रक्कम जमा करावी.**

**A/c Name**

**A/c Name :**
**Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**सहकार सुगंध कार्यालय**

**ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,**
**५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर,**
**गणेशमळा, सिंहगड रोड,**
**पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३**
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक –** भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

# सहकारी संस्थांना देखील हवा सीएसआर निधी!

सर्वप्रथम सर्वांना नवीन आर्थिक आणि सहकार वर्षाच्या (२०२६-२७) शुभेच्छा! गेल्या वर्षीचा आर्थिक लेखाजोखा, लेखा परिक्षण करण्यात सहकारी संस्थांचे पदाधिकारी व्यस्त असतील. आपण निर्धार केलेला संकल्प पूर्ण झाला की नाही आणि नवीन उद्दिष्टे पूर्ण होतील की नाही अशी स्थिती दरवर्षीच येत असते. सहकारी संस्थांच्या एकूण संख्येबरोबरच त्यातील गुणात्मक वाढ करणाऱ्या संस्थांची संख्या वाढवण्याची गरज आहे. देशाच्या एकूण अर्थकारणात सहकारी संस्थांचा मोठा वाटा आहे. यामध्ये नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांचा मोठा सहभाग आहे. एकट्या सारस्वत सहकारी बँकेचा व्यवसाय १ लाख कोटींच्या पुढे गेला आहे. देशभरात सुमारे १४५० नागरी बँका आहेत तर देशातील एकूण सहकारी संस्थांची संख्या ८ कोटींपेक्षा अधिक आहे. आर्थिक उलाढालीत सहकारी संस्थांची लक्षणीय प्रगती झाली आहे, त्याचबरोबर त्यांची नफा क्षमता देखील वाढलेली आहे. सहकार क्षेत्र हे भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचा कणा आहे.

सहकारी संस्थांना त्यांच्या नफ्यातून विविध प्रकारच्या तरतुदी केल्यानंतर राहिलेला नफा लाभांश रुपाने सभासदांना वितरीत करावा लागतो. त्याचबरोबर काही प्रमाणात सामाजिक कार्यासाठी देखील काही रक्कम खर्च करता येते. भारतामध्ये सहकार चळवळ ही केवळ आर्थिक व्यवहारांपुरती नसून सामाजिक विकासाचे एक प्रभावी माध्यम म्हणून ओळखली जाते. ग्रामीण आणि शहरी भागात सहकारी संस्था शेतकरी, लघुउद्योग, महिला बचत गट, तसेच सामान्य नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी मोठे योगदान देत आहेत. नागरी सहकारी बँकांना अनेकविध बंधने आहेत. रिझर्व्ह बँकेने नफ्याच्या १ टक्यापेक्षा अधिक रक्कम सामाजिक कार्यासाठी देता येणार नाही, असे सहकारी बँकांना बंधन आहे. त्यामुळे चांगला नफा क्षमता असलेल्या बँकादेखील सामाजिक कामांसाठी निधी देऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) अंतर्गत निधी वितरणाच्या धोरणात सहकारी बँकांचा आणि सर्वच संस्थांचा समावेश असणे, ही काळाची गरज आहे. सहकारी संस्था ज्या मोठ्या प्रमाणावर थेट जनतेशी निगडीत काम करतात, त्या तुलनेत त्यांना CSR निधीपासून वंचित ठेवणे ही एक मोठी विसंगती आहे. सहकारी संस्था स्थानिक गरजा ओळखून त्यावर उपाययोजना करतात, त्यामुळे CSR उपक्रमांची परिणामकारकता वाढविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात.

दुसरी बाजू म्हणजे अनेक कॉर्पोरेट उद्योग CSR निधी देतांना सहकार चळवळीला बाजूला ठेवतांना दिसतात. विशेषतः कृषी, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये सहकारी संस्थांचे काम उल्लेखनीय आहे. अनेक वेळा या संस्थांकडे प्रकल्प राबविण्याची क्षमता असते, मात्र आर्थिक मर्यादांमुळे त्यांची व्याप्ती कमी राहते. CSR निधीचा योग्य वापर करून या संस्था अधिक व्यापक स्तरावर काम करू शकतात, ज्याचा थेट फायदा समाजाच्या तळागाळातील घटकांना होऊ शकतो. सहकारी संस्थांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्त्वाची भावना असतेच. सभासदांच्या सहभागामुळे निर्णयप्रक्रिया अधिक लोकाभिमुख होते. त्यामुळे CSR निधीचा अपव्यय होण्याची शक्यता नाहीच, किंबहुना तो योग्य ठिकाणी वापरला जाईल.

सरकारने CSR नियमांमध्ये आवश्यक बदल करून सहकारी संस्थांना पात्रता देणे गरजेचे आहे. काही निकषांवर आधारित सहकारी संस्थांची निवड करून त्यांना CSR निधी देणे किंवा त्यांनी CSR निधी देणे हा एक सकारात्मक निर्णय ठरेल. CSR निधीचा योग्य वापर करून या क्षेत्राला बळकटी दिल्यास देशाच्या सर्वांगीण प्रगतीस चालना मिळेल. त्यामुळे सहकारी संस्थांना CSR निधी देण्याची तरतूद करणे हे केवळ धोरणात्मक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही अत्यंत आवश्यक आहे.

जय सहकार!



संपादकीय...

# सहकार तत्त्वावरील

# भारत टॅक्सी उपक्रमाचा विस्तार शहर आणि तालुका स्तरावर होणार

**नवी दिल्ली –** सहकारी तत्त्वावर नुकतीच सुरू करण्यात आलेली भारत टॅक्सी उपक्रमाचा विस्तार नजीकच्या काळात शहर आणि तालुका स्तरावर करण्यात येणार आहे, असे सहकार राज्यमंत्री कृष्णपाल यांनी सांगितले. या अभिनव उपक्रमाचा प्रारंभ काही दिवसांपूर्वी दिल्लीमध्ये करण्यात आला आहे.

हा नवीन उपक्रम सुरू करण्याबाबत बोलताना ते म्हणाले, या माध्यमातून चालकाना सक्षम करणे त्यांचे उत्पन्न वाढविणे हा आहे. याचे बुकिंग मोबाईल ॲपद्वारे करता येणार आहे. यामध्ये सुरक्षा हमी आणि पारदर्शकता असणार आहे. आगामी दोन तीन वर्षात या सेवेचा विस्तार शहर आणि तालुका स्तरावर करण्यात येणार आहे. आजवर सुमारे चार लाख चालक या उपक्रमात सहभागी झाले आहेत.

अशा स्वरूपाचा उपक्रम देशामध्ये प्रथमच सुरू करण्यात आल्यामुळे सहकार क्षेत्राला आणखी एक नवे दालन खुले झाले आहे.




# सर्वसमावेशक सहकार धोरण लवकरच जाहीर करणार – सहकारमंत्री पाटील



**मुंबई –** महाराष्ट्राचे नवे सर्वसमावेशक सहकार धोरण नजीकच्या काळात जाहीर करण्यात येणार आहे, असे राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी जाहीर केले आहे. या नवीन धोरणामुळे सहकार क्षेत्र अधिक सक्षम, पारदर्शक आणि गतिमान होण्यास हातभार लागणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

सहकार क्षेत्र हे केवळ आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, असे नमूद करून ते म्हणाले, नवीन धोरणाच्या निर्मितीसाठी १५ सदस्य समिती तयार करण्यात आली होती. त्यामध्ये राज्यातील विविध जिल्ह्यांतील तज्ज्ञ, अभ्यासक यांचा समावेश आहे. राज्याच्या विविध जिल्ह्यांत सध्या पावणेतीन लाखांपेक्षा अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत. तसेच सहकारी बँकांमधील ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

# राज्य सहकारी बँकेचे यूपीआय प्रणाली व्यवहार सुरू

**मुंबई –** राज्य सहकारी बँकेच्या वतीने यूपीआय व्यवहार सुरू करण्यात आल्याने त्याचा फायदा जिल्हा – नागरी बँका, विकास सोसायट्या आणि सहकार क्षेत्रातील अन्य संस्थांना होणार आहे. राज्य सहकारी बँकेने स्वतंत्र डिजिटल यंत्रणा उभी केल्याने राज्यातील सहकार क्षेत्र स्वावलंबी होण्यास हातभार लागणार आहे.




या नवीन उपक्रमाचा फायदा राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँका आणि सुमारे २१ हजारपेक्षा अधिक विकास सोसायट्या यांना होणार आहे. हा उपक्रम हाती घेणारी राज्य सहकारी बँक ही देशातील पहिली शिखर बँक ठरणार आहे, असे प्रशासक अनास्कर यांनी सांगितले.

राज्यातील सर्व सहकारी संस्थांना पेमेंट कलेक्शनसाठी राज्य बँकेचे अधिकृत यूपीआय हँडल वापरता येणार आहे. सध्याच्या स्थितीमध्ये जिल्हा आणि नागरी सहकारी बँकांना व्यापारी बँकावर अवलंबून राहावे लागते आहे. या पुढील काळात सहकार क्षेत्रातील व्यवहार या नवीन उपक्रमामुळे सुरक्षित राहतील.

या पुढील काळात जिल्हा नागरी आणि विकास सोसायटया, सहकार क्षेत्रातील दूध संघ, साखर कारखाने आणि अन्य सर्व सहकारी संस्थांना राज्य सहकारी बँकेची यूपीआय प्रणाली व्यवस्था वापरता येणार आहे, असे ते म्हणाले.

# सहकारी पाणी पुरवठा संस्थांचा वीज थकबाकीचा प्रश्न गंभीर

**मुंबई –** राज्यातील सुमारे १८०० सहकारी पाणी पुरवठा संस्थांचा वीज थकबाकीचा प्रश्न गंभीर झाला असून वीज दरवाढीच्या निर्णयामुळे या संस्था अडचणीत आल्या आहेत. या संस्थांची थकबाकी कृषी संजीवनी योजनेअंतर्गत माफ करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार गट आमदार जयंत पाटील यांनी केली आहे.

गेली ३० ते ४० वर्षांपासून राज्याच्या विविध भागात कार्यरत असणाऱ्या सहकारी संस्थांची वीज थकबाकी ही अंदाजे ७० ते ८० कोटींच्या जवळपास असून गेल्या वर्षीपासून वीज दरात प्रति युनीट ५ रुपये १६ पैसे इतकी वाढ झाली आहे. त्यामुळे ही वाढ संस्थांना परवडणारी नाही.

शासनाच्या वतीने साडेसात एचपीपर्यंतच्या व्यक्तीगत कृषी पंपांना मोफत वीज देण्यात येत आहे. मात्र सहकारी संस्थांना या सवलतीमधून वगळण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

# सहकारी पतसंस्थांमधील ठेवींना विमा संरक्षण – सहकारमंत्री पाटील

**मुंबई –** राज्यातील सहकारी पतसंस्थांमध्ये असणाऱ्या ठेवींना विमा संरक्षण असावे, यासाठी विविध विमा कंपनी यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत, अशी माहिती राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितली. पतसंस्थांमध्ये समाजातील विविध घटकांच्या ठेवी आहेत.

राज्याच्या विविध भागात सध्या १९,९४८ सहकारी पतसंस्था कार्यरत असून त्यांच्याकडे ९०,५०० कोटींच्या ठेवी आहेत. या ठेवी सुरक्षित असाव्यात, यासाठी शासनाने स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधी योजना तयार केली आहे. योजनेत सहभागी होणाऱ्या पतसंस्थांना १ एप्रिल २६ पासून योजनेचा लाभ देण्याचा प्रस्ताव आहे. त्याचप्रमाणे केंद्रीय सहकार मंत्रालयाबरोबर चर्चा करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# नागरी सहकारी बँकांनी आरबीआयच्या नियमांचे पालन करावे - मराठे





**पुणे –** नागरी सहकारी बँकांनी आरबीआयच्या सर्व नियमांचे पालन करून बँक सदस्य, ग्राहक यांचे हित साधण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे ग्राहक हितासाठी विविध धोरणे तयार करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे आवाहन आरबीआय आणि नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांनी केले आहे.

पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या वतीने प्रकाशित केलेल्या एन. के. खासबारदार व जी. के. द्रविड लिखित हँडबुक ऑफ सिक्युरिटायझेशन अ‍ॅक्ट या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, बँक अध्यक्ष पुणे पीपल्स सहकारी बँक व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुभाष मोहिते आदी व्यासपीठावर होते.

वसूली कामकाजामध्ये या पुस्तकाचा उपयोग होणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, असोसिएशनने हा एक चांगला उपक्रम हाती घेतला आहे. अनास्कर यांनी सांगितले की, या पुस्तकाचा अभ्यास करून त्यानुसार बँकांनी कार्यवाही करावी आणि आवश्यक त्या सुधारणा करता येतील.

बँक अध्यक्ष ढमढेरे यांनी स्वागत केले तर चंद्रकांत शेळके यांनी आभार मानले.


पुणे नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., पुणे (महाराष्ट्र) प्रकाशित

**Handbook of Securitization Act**

पुणे नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि.,पुणे (महाराष्ट्र) ने नुकतेच दीर्घ अनुभवी वकील श्री.नरेंद्र के.खासबारदार व श्री. गणेश के.द्रविड या दोघांनी लिहिलेले 'Handbook of Securitization Act' हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

सिक्युरिटायझेशन कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न व त्यांची उत्तरे अशा स्वरुपात हे पुस्तक लिहिण्यात आले असून थकबाकीदारांना द्यावयाच्या नोटीसींचे नमुनेही त्यात देण्यात आलेले आहेत. त्यामुळे थकीत कर्जाच्या वसुलीसाठी तसेच एनपीए कमी करण्यासाठी बँकांना सिक्युरिटायझेशन कायद्यातील तरतुदी प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तकाला आरबीआय आणि नाबार्डचे संचालक मा.श्री. सतिश के. मराठे यांनी तसेच असोसिएशनचे मानद सचिव व पुणे पीपल्स को–ऑप. बँकेचे व्यवस्थापकीय अध्यक्ष मा.अ‍ॅड. सुभाष मोहिते यांनी प्रस्तावना दिली आहे.

सर्व बँकांच्या ग्रंथालयात असावे अशा या मार्गदर्शक पुस्तकाची पुस्तकाची किंमत रु.५५०/– असून ते असोसिएशनच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहे. दि. ३१–०३–२०२६ पर्यन्त फक्त नागरी सहकारी बँकांसाठी १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. (कुरिअर/पोस्टेज खर्च वेगळा आकारण्यात येईल.)

सध्या पुस्तकाच्या प्रती मर्यादित असल्याने कृपया आपल्या बँकेसाठीच्या पुस्तकाची मागणी त्वरीत नोंदवावी. मागणीसाठी संपर्क क्र. : ७४४७७४०१३०, ई–मेल : punebankasso@gmail.com


# सहकार क्षेत्राला बळकटी देणारा सकारात्मक अर्थसंकल्प - विद्याधर अनास्कर

**विधानसभा अधिवेशनात महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. या अर्थसंकल्पात सहकार क्षेत्रासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठीच्या उपाययोजना यावर राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केलेले सविस्तर विवेचन...**

**पुणे –** महाराष्ट्राच्या आर्थिक रचनेत सहकार क्षेत्राचे विशेष स्थान आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न दिसत असल्याने कृषी प्रक्रिया, ग्रामीण वित्तीय सेवा आणि लघू उद्योगांना चालना देण्यासाठी सहकारी संस्थांचा विशेष उपयोग होऊ शकतो. योग्य ते धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास राज्याचे सहकार क्षेत्र ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देऊ शकते, यामुळे सहकार क्षेत्रासाठी ही संधी उपलब्ध होऊ शकते, असा विश्वास दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात राज्याच्या आर्थिक विकासाला गती देणे, पायाभूत सुविधांचा विस्तार करणे कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे आणि सामाजिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे, या चार प्रमुख उद्दिष्टांचा समावेश असल्याने यंदाचा अर्थसंकल्प हा योग्य अंमलबजावणी झाल्यास राज्याला गतीमान विकासाकडे नेणारा ठरेल.



**विद्याधर अनास्कर**

अर्थसंकल्पात कृषी प्रक्रिया उद्योग, शीत गृहे व्यवस्था, साठवणूक व मूल्यवर्धन यावर भर देण्यात आला आहे. या क्षेत्रामध्ये सहकारी संस्थांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरू शकते. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाचे प्रक्रिया, उद्योग, निर्यात व विपणन यामध्ये सहकारी संस्थांद्वारे अधिक संघटित व्यवस्था उभारता येऊ शकेल. नागरी सहकारी बँका, राज्य बँक व जिल्हा सहकारी बँका या ग्रामीण व लघु उद्योग क्षेत्रासाठी वित्त पुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या संस्था आहेत.

एम.एस.एम.ई. स्टार्टअप्स् कृषी प्रक्रिया यांना कर्ज पुरवठा करण्यामध्ये सहकारी बँकांनी अधिक सक्रिय भूमिका घेण्याची संधी आहे. योग्य नियामकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास सहकारी बँका आर्थिक समावेशनात मोठे योगदान देऊ शकतात. अर्थसंकल्पातील ग्रामीण उद्योग विकासाच्या योजनांमुळे सहकारी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकते.

अर्थसंकल्पात ग्रामीण विकास, कृषी प्रक्रिया आणि उद्योग विकासावर दिलेला भर सहकार क्षेत्रासाठी सकारात्मक संधी निर्माण करणारा आहे. राज्यातील सहकारी संस्था जर योग्य व पारदर्शी व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान यांचा स्वीकार करतील तर राज्याच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका प्रभावी ठरू शकते, असेही अनास्कर म्हणाले.

# राज्य सहकारी बँकेला स्वत:चे अधिकृत यूपीआय हँडल

**पुणे** – राज्य सहकारी बँकेने नुकताच एअरपे या तंत्रज्ञान कंपनीबरोबर सहयोग करार केला असून बँकेने स्वतंत्र यूपीआय स्वीकारकर्ता बँक म्हणून सेवा सुरू केली आहे. स्वत:चे अधिकृत युपीआय हँडल असणारी देशातील पहिली राज्य शिखर बँक बनण्याचा बहुमान बँकेने मिळविला आहे, अशी माहिती बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितली.

ते म्हणाले, राज्यातील जिल्हा बँका, विविध कार्यकारी सोसायटी या उपक्रमांत सहभागी आहे, असे नमूद करून ते म्हणाले, सर्व संस्थांना डिजिटल प्रणालीशी जोडण्यासाठी आणि त्यांचे बँकिंग व्यवहार अधिक गतिमान होण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. राज्य सहकारी बँक एअरपे या तंत्रज्ञान कंपनीबरोबर सेवा देणार आहे. सहकारांतर्गत सहकार या मुख्य तत्त्वानुसार सहकार क्षेत्रातील सर्व संस्थांना एकाच डिजिटल पेमेंट व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत राज्य सहकारी बँक नागरी सहकारी बँका, विविध सहकारी संस्था, दूध संघ, साखर कारखाने आणि अन्य सहकारी संस्थांना अधिकृत युपीआय हँडल उपलब्ध करून देणार आहे. या संस्थांना पेमेंट स्वीकारण्यासाठी शिखर बँकेचे अधिकृत युपीआय हँडल वापरणे शक्य होणार आहे. यास नवीन उपक्रमामुळे सहकारी संस्थांना आर्थिक व्यवहार करणे सुलभ होणार आहे. यामुळे सहकार क्षेत्रावरील विश्वास वाढण्यास मदत होणार आहे. राज्य सहकारी बँकेच्या या उपक्रमामुळे राज्यातील सहकार क्षेत्र डिजिटलदृष्ट्या अधिक सक्षम होण्यास हातभार लागणार आहे, असे ते म्हणाले.

## सहकार क्षेत्रातील विविध पुरस्कार रकमेत वाढ करण्याचा शासनाचा निर्णय

**पुणे** – सहकार क्षेत्राला अधिक गतिमान करण्यासाठी आणि चालना देण्यासाठी शासनाने सहकार पुरस्काराच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे सन २०१२-१३ पासून शासनाच्या वतीने विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

सहकार महर्षी पुरस्कार रक्कम एक लाखावरून तीन लाख सहकार भूषण पुरस्कार ५१ हजार वरुन दीड लाख, सहकारनिष्ठ पुरस्कार रक्कम २५ हजार वरुन ५१ हजार करण्यात आली आहे. यामुळे एकूण पुरस्कार खर्च हा १७.४६ वरुन ४६.२३ लाख रुपये इतका झाला आहे. या निर्णयामुळे सहकारी संस्था अधिक प्रभावीपणे काम करतील आणि विविध उपक्रम हाती घेतील.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षनिमित्त गतवर्षी अनेकविध उपक्रम हाती घेण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कार रकमेत वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रस्तावाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

## सोलापूर जनता सहकारी बँकेच्या नफ्यात वाढ

**सोलापूर** – येथील सोलापूर जनता सहकारी बँकेच्या नफ्यात गेल्या चार वर्षांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून नफा १०० कोटीपेक्षा अधिक झाला आहे, अशी माहिती बँकेचे विद्यमान अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी सांगितली.

ते म्हणाले, सन २०२१ मध्ये बँकेचा तोटा ११ कोटी ८६ लाख रुपये होता. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत बँकेने हा तोटा भरून काढण्यात यश मिळविले असून बँकेने भरीव कामगिरी नोदविली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे एनपीए १७.१३ टक्के होता. त्यामुळे सदस्यांना लाभांश देता आला नाही. यावर्षीचा बँकेचा निव्वळ फायदा हा २५ ते ३० कोटी इतका राहील तर एनपीए हा ०.३२ टक्के आहे. बँकेची आर्थिक स्थिती सुधारत असल्याने गेल्या काही वर्षांत बँकेने सदस्यांना लाभांश दिला आहे.

बँकेच्या ठेवी या २२० कोटी इतक्या झाल्या आहेत असे नमूद करुन ते म्हणाले, भांडवल पर्याप्तता २० टक्के पेक्षा अधिक आहे. सीडी रेषो ६० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. बँकेने तीन हजार कोटींपेक्षा अधिक मिश्र व्यवसाय केला आहे बँकेने स्वत:ची मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिली आहे आणि नजीकच्या काळात नेट बँकिंग सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. मुख्य बाब म्हणजे बँकेचा यूपीआय प्रणालीमध्ये समावेश होणार आहे. त्यामुळे ग्राहकांना त्याचा लाभ मिळणार आहे. आर्थिक वर्षात नवीन चार शाखा सुरू करण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

## ग्रामीण भागाच्या परिवर्तनासाठी सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची - सुरेश प्रभू



**पुणे** – देशांमध्ये अंदाजे ८० ते ९० टक्के जनता सहकार क्षेत्राशी निगडीत असून ग्रामीण भागाच्या परिवर्तनासाठी सहकार महत्त्वाचा आहे, असे माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी सांगितले. येथील आयएमडीआरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बांबूकोंन प्रदर्शनाचा समारोप झाला त्यावेळी ते बोलत होते. सहकार चळवळीत बांबू - शाश्वतता आणि समृद्धीची जडणघडण ही मूळ संकल्पना होती.

ते म्हणाले, शाश्वत उद्योग म्हणून बांबूकडे पाहण्याची गरज आहे. या क्षेत्राला सहकार क्षेत्राची आणि संस्थात्मक धोरणाची जोड मिळाली तर बांबू उद्योग गतीने विकसित करण्यास चालना मिळणार आहे. बांबूची लागवड वाढत असून त्याला संस्थात्मक स्वरूप दिल्यास बांबूच्या क्षमतेचा पूर्ण वापर होणार आहे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी येणार आहे. सन १९९८ मध्ये देशामध्ये प्रथमच बांबू लागवडीस व्यापक स्वरूपात चालना देण्यात आली. कारण देशाचे पर्यावरण आणि अर्थव्यवस्था बदलण्याची क्षमता बांबूमध्ये आहे.

बांबूमध्ये विविध आणि चांगले प्रयोग करण्याचा विचार यापुढील काळात करण्याची गरज आहे असे नमूद करून ते म्हणाले, सहकाराच्या माध्यमातून निर्माण होणारी संपत्ती सदस्यांच्याकडे जाते, हा सहकार क्षेत्राचा एक भाग आहे. सहकारी संस्थेच्या माध्यमातून उत्तम डिझाईन, उत्पादने बांबूपासून तयार झाली तर त्याचे विपणन, विक्री आणि निर्यात करता येणे शक्य आहे. परिणामी बांबूसाठी सहकार क्षेत्र गेमचेंजर ठरू शकते, असे ते म्हणाले.

## अण्णासाहेब मगर सहकारी बँक संचालकपदी अविनाश गवारे

**पुणे** – पिंपरी येथील अण्णासाहेब मगर सहकारी बँकेच्या संचालकपदी अविनाश गवारे यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली आहे. बँकेचे अध्यक्ष नंदू लांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी माणिक येळवंडे सहकारी संस्था उपनिबंधक मुकुंद पवार तसेच पदाधिकारी, संचालक, अधिकारी उपस्थित होते. नूतन संचालक गवारे यांचे उपस्थितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विश्वासार्ह व्यावसायिकता सहकारात गरजेची - अनास्कर

**लोणावळा –** सहकार चळवळीत काम करतांना प्रामाणिकपणे आणि विश्वास निर्माण होईल अशा पद्धतीने व्यवहार करण्याची आवश्यकता आहे. व्यावसायिकता जपताना कुठेही अन्याय होणार नाही आणि सर्वसामान्यांना सहकाराचा फायदा होईल, अशा संस्था चालवल्या पाहिजेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केले. सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाच्या कार्यकारिणी बैठकीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष भाऊ कड उपस्थित होते.




प्रास्ताविकामध्ये बोलताना महामंत्री विवेक जुगादे यांनी प्रदेशाच्या कामाचा आढावा घेतला. सहकार कायद्याच्या बदलासबंधी तसेच सहकार धोरण तयार करतांना आलेल्या सूचनांचा यावेळी विचार करण्यात आला. यावेळी रिझर्व बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी त्रिभुवन सहकार विद्यापीठामुळे सहकार क्षेत्राला कुशल व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होईल असे सांगितले व विद्यापीठात चालविण्यात येणाऱ्या विविध कोर्सेसची माहिती दिली.




याप्रसंगी बोलतांना डॉ. उदय जोशी यांनी देशभरात सहकार भारती जवळपास सर्व राज्यात मोठ्या प्रमाणावर काम करत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास संघटन प्रमुख शरद जाधव, सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी तसेच सहकार भारतीचे प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते. पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी आभार मानले.

यावेळी उद्योगवर्धिनी सोलापूरच्या संस्थापिका चंद्रिका चव्हाण व भगीरथ ग्रामविकास प्रकल्पाचे डॉ. प्रसाद देवधर यांनी काम करताना आलेले अनुभव आणि यशोगाथेचा प्रवास उलगडून दाखविला.

सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर यांनी कार्यकर्त्यांचा प्रवास आणि संपर्क या विषयावर आपले विचार मांडले. सहकार चळवळीतील कार्यकर्त्यांच्या घरापासून त्यांच्या संस्थांपर्यंत सर्वांचा संपर्क असायला हवा. त्याचबरोबर सहकारातले प्रश्न सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रशिक्षीत होवून आपला सक्रीय सहभाग नोंदवण्याची गरज आहे.

सहकारातील विविध फेडरेशन व संघटनांमध्ये सहकार भारतीचे अनेक कार्यकर्ते निवडून येत आहेत. ही उपलब्धी आपल्या सर्वांच्या सामुहिक कार्याची पावती असल्याचे समारोपात सतीश मराठे यांनी सांगितले.

---

# साहेबराव खामकर लिखित 'गोष्ट साखरेची' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे –** सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेशचे साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख साहेबराव खामकर लिखित 'गोष्ट साखरेची' पुस्तकाचे प्रकाशन प्रदेश कार्यकारिणीचे बैठकीमध्ये रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे व राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांचे हस्ते करण्यात आले. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय जोशी यांचे हस्ते खामकर यांचा सत्कार करण्यात आला.




प्रास्ताविकामध्ये सहकार भारती प्रदेशचे महामंत्री विवेक जुगादे यांनी पुस्तकाबद्दल माहिती देऊन हे पुस्तक अभ्यासपूर्वक लिहिले असून सर्वांनाच उपयुक्त असल्याचे सांगितले. तर अनास्कर यांनी सांगितले की, सर्व सहकारी संस्था व्यावसायिक पद्धतीने व प्रामाणिकपणाने चालविल्या पाहिजेत.

आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी त्रिभुवन सहकार विद्यापीठामुळे सहकार क्षेत्राला कुशल व पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होईल आणि विद्यापीठात चालविण्यात येणाऱ्या विविध कोर्सेसची माहिती दिली. पुस्तकाचे लेखक खामकर म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या कृषी व औद्योगिक विकासात साखर उद्योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. राज्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक प्रगतीमध्ये साखर उद्योगाचा सिंहाचा वाटा आहे. साखर ही प्रत्येकाच्या दैनंदिन संबंधातील वस्तू आहे. परंतु या साखरेचा जन्म कसा झाला. त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाची म्हणजे ऊसाची उत्पत्ती कशी व कधी झाली. साखर उत्पादन करणारे कारखाने केव्हा निर्माण झाले व त्यामध्ये कालानुरूप कसे बदल झाले इ. सह राष्ट्रीय सहकार धोरण, इथेनॉल धोरण, एफ.आर.पी., एआय तंत्रज्ञान आदी विषयांचा देखील पुस्तकामध्ये थोडक्यात ऊहापोह केला आहे.

सहकार भारती प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके संघटन प्रमुख शरद जाधव सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी सहकार भारतीचे प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते. पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी आभार मानले.

# लेखा परीक्षण विषयावरील एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी



**नागपूर** – लेखा परीक्षण करताना येणाऱ्या अडचणी दूर कशा करायच्या, लेखा परीक्षण प्रक्रिया सक्षम व पारदर्शक करणे, सायबर गुन्ह्याबाबत लेखा परीक्षक यांच्यामध्ये जागृती करणे आणि लेखापरीक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास अशा विविध विषयांवर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. नागपूर भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील लेखा परिक्षक कार्यशाळेत सहभागी झाले होते.

सहकार विभागाचे माजी अप्पर निबंधक श्रीराम मुन आणि माजी विशेष कार्याधिकारी लक्ष्मण बोदडे, विभागीय सहनिबंधक सदानंद वुईके, जयंत गेडाम आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन उपलेखापरीक्षक विनोद पारजवार यांनी तर जिल्हा विशेष लेखा परीक्षक विवेक पाटील यांनी आभार मानले.

# नागपूर नागरिक सहकारी बँकेचा ग्राहकांसाठी यूपीआय पेमेंट सेवेचा प्रारंभ

**नागपूर** – नागपूर नागरिक सहकारी बँकेने तीन राज्यांतील ग्राहकांसाठी यूपीआय पेमेंट सेवेचा प्रारंभ केला आहे. बँकेच्या वतीने यूपीआय मोबाइल बँकिंग ॲप तयार करण्यात आले आहे. यासाठी बँकेच्या तज्ज्ञांनी डिझाइन तयार केले असून डिझाइनला नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने प्रमाणित केले आहे.

या नवीन सुविधेमुळे बँक ग्राहकांना फोन पे पेटीएम, गुगल पे अथवा भीम ॲप या सर्व स्वरुपाच्या मोबाइल ॲप्लिकेशनवर देशभरात कोठूनही कुठेही सुरक्षित व्यवहार करू शकणार आहे. त्याचप्रमाणे ग्राहकांना क्यूआर कोड द्वारे पैसे मागविणे अथवा पाठविणे सहज शक्य होणार आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष प्रा. संजय भेंडे यांनी सांगितली.

ते म्हणाले, या नवीन सुविधेमुळे ग्राहक संख्या वाढण्यास हातभार लागणार आहे. सहकारी बँकिंग क्षेत्रात प्रथमच एटीएम सेवा देणारी त्याचप्रमाणे आरटीजीएस एनइएफटीमध्ये थेट सदस्यत्व मिळविणारी नागपूर नागरिक सहकारी बँक तंत्रज्ञानयुक्त सेवा देण्यात आघाडीवर राहिली आहे. बँकेच्या नव्याने ७ शाखा सुरू करण्यात येणार आहेत, तेथेही ही नवीन सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

# चंद्रपूर देखरेख सहकारी संस्थेच्या नवीन शाखेचे उद्घाटन



**चंद्रपूर** – 'जिल्हा देखरेख सहकारी संस्था, चंद्रपूर'च्या नवीन शाखेचा उद्घाटन समारंभ उत्साहात झाला. सहकार क्षेत्रातील जनसामान्यांच्या विश्वासाचे प्रतीक असलेल्या संस्थेची सेवा आता कोरपना तालुक्यातील जनतेसाठी सज्ज झाली आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीडीसीसी बँक संचालक विजय बावणे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपनिबंधक ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी काळे, सभापती अशोक बावणे उपस्थित होते. कोरपना, राजुरा व जिवती तालुक्यातील गटसचिव, सेवा सहकारी संस्थांचे अध्यक्ष आणि सहकार क्षेत्रातील स्नेही उपस्थित होते. नवीन शाखा कोरपना परिसरातील शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या प्रगतीसाठी एक महत्त्वाचे केंद्र ठरेल.

# ग्राहक सेवा केंद्र ग्राहकांसाठी कार्यरत



**नागपूर** – सावरगाव येथील संताजी युवक ग्रामीण बिगर शेतकी पतसंस्था आणि गिरनार अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच ग्राहक सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे.

सोसायटीचे अध्यक्ष जयंत दाढे, गिरनार सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र घाटे तसेच संचालक आणि पदाधिकारी अधिकारी या वेळी उपस्थित होते. नगर परिषद अध्यक्ष मनोज कोरडे, उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

या ग्राहक सेवा केंद्राच्या माध्यमातून विविध स्वरुपाच्या सेवा ग्राहकांना उपलध करून घ्यावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी जाहीर करण्यात आले आहे. या सेवांचा ग्राहकांनी लाभ घेता यावा, असे आवाहन करण्यात आले.

# सहकार क्षेत्रातील महिलांची भूमिका

जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगा ते उद्धारी (किंवा राष्ट्र उद्धारी) ही प्रसिद्ध मराठी म्हण मातेच्या संस्कारांचे आणि मुलांच्या जडणघडणीतील तिच्या महत्त्वाचे वर्णन करते. याचा अर्थ असा की, मुलांचे संगोपन आणि संस्कार करणारी आई, राष्ट्र आणि जगाचे भविष्य घडवते. ही म्हण महिलांच्या सशक्तीकरणाचे आणि समाजात मातेच्या सर्वोच्च स्थानाचे निदर्शक आहे. या म्हणीप्रमाणे आज सहकार क्षेत्रातही महिलांची कामगिरी उत्तम आणि उल्लेखनीय आहे.



छाया शुक्ला

सहकार क्षेत्रात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असून, त्या आर्थिक सक्षमीकरण, ग्रामीण विकास आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय योगदान देत आहेत. महिला बचत गट, सहकारी पतसंस्था, दुग्धव्यवसाय आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या (FPOs) माध्यमातून महिला आर्थिक स्वातंत्र्य मिळवत आहेत. बहुराज्यीय सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांमध्ये महिलांसाठी आरक्षण बंधनकारक करण्यात आले आहे.

भारतामध्ये सुमारे ८.५ लाख सहकारी संस्था आहेत, आणि त्यामुळे भारत हा जगातील सर्वात मोठी सहकारी चळवळ असलेल्या देशांपैकी एक आहे. मात्र, यातील फक्त २.५२ टक्के संस्था फक्त महिलांच्या आहेत, असे नीती आयोगाच्या २०२३ च्या अहवालात नमूद केले आहे. ही संख्या आश्चर्यकारकपणे कमी होती, विशेषतः जेव्हा आपण महिला सहकारी संस्थांतील सहभागाचे ठळक आणि यशस्वी उदाहरण पाहतो, जसे की सेवा (SEWA), ज्यात ३२ लाख स्वयंरोजगार करणाऱ्या महिला सदस्य आहेत; अमूल, ज्यामध्ये ३६ लाख महिला दुग्ध उत्पादक आहेत; आणि 'लिज्जत', ज्या संस्थेने ४५,००० महिलांसाठी विकेंद्रित उत्पादनाची पद्धत तयार करून त्यांना घरूनच उत्पादन आणि कमाई करण्याची संधी दिली गेली आणि यामुळे सहकार क्षेत्र मजबूत होत गेले.

**नुकताच जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने हा विशेष लेख...**

अनेक अभ्यासांमध्ये आढळले आहे की, सहकारी संस्थांनी ग्रामीण महिलांना आर्थिक साक्षरता आणि उद्योजकतेच्या कौशल्यांमध्ये सुधारणा करण्यास, तसेच बचत वाढवण्यास आणि कुटुंबाचे उत्पन्न वाढवण्यास मदत केली आहे. केवळ आर्थिक सशक्तीकरणच नव्हे, तर भारतातील अनुभवावरून हेही दिसून आले आहे की सहकारी संस्थांमुळे महिलांना सामाजिक आणि राजकीय सशक्तीकरण मिळाले असून, बँकिंग, घरकुल, विमा, आरोग्य, पोषण, शिक्षण आणि बालसंवर्धन यांसारख्या मूलभूत सेवा मिळवणे सुलभ झाले आहे. सहकारी संस्थांमुळे महिलांना परस्पर विश्वास, परस्पराधारित संबंध आणि सामूहिक कृती यांच्याद्वारे 'सामाजिक भांडवल' प्राप्त होते, जे त्यांची संकटांचा सामना करण्याची क्षमता (resilience) वाढवते.

महिला सहकारी संस्था बहुतेकदा बंधुभाव, समानता आणि एकतेतून मिळणारी ताकद या कल्पनांवर बांधल्या जातात. बहुतेक महिला सहकारी संस्था लहान प्रमाणात आहेत, त्यांच्याकडे मर्यादित संसाधने आहेत आणि धोरणकर्त्यांच्या दृष्टीने त्या जवळजवळ अदृश्य आहेत. महिला सदस्यांना शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि आर्थिक साक्षरता यामध्ये मर्यादित प्रवेश आहे. याशिवाय, घरगुती आणि अप्रत्यक्ष (विनावेतन) कामांचे ओझे, गावांमधील हालचालीवरील किंवा दळणवळणातील निर्बंध, अशा सांस्कृतिक अडथळ्यांमुळे त्यांचा सहभाग अधिक मर्यादित राहतो. २०२१ मध्ये पंजाबमधील एका महिला दुग्ध सहकारी संस्थेवर करण्यात आलेल्या अभ्यासात असे आढळले की सदस्यांमध्ये आत्मविश्वासाची आणि निर्णयक्षमतेची कमतरता होती आणि सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनासाठी त्यांना सातत्याने अधिकाऱ्यांची मदत लागायची. सेवा (SEWA) च्या अभ्यासांनुसार, बहुतांश महिला सहकारी संस्थांना व्यवसायिक मार्गदर्शन आणि देखरेख यांची नितांत आवश्यकता असते, जेणेकरून त्या स्थिरपणे आणि प्रभावीपणे कार्यरत राहू शकतील.

सहकारी संस्थांमध्ये लिंग समानता सुधारण्यासाठी वैयक्तिक महिलांची क्षमता वाढवणे हा देखील एक महत्त्वाचा मुद्दा असला पाहिजे, विशेषतः अनेक विकसनशील देशांमध्ये महिलांना सामान्यतः अनुभवावा लागणारा शिक्षणाचा अभाव आणि त्यानंतरच्या व्यवसायातील तफावत यामुळे प्रशिक्षण आणि शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये महिलांचे समान प्रमाण असेल याची खात्री करण्यासाठी विशेष काळजी घेतली पाहिजे. शिवाय, हे कार्यक्रम महिलांच्या गरजांबद्दल विशेषतः संवेदनशील असले पाहिजेत, आवश्यक असल्यास विशिष्ट डिझाइनच्या मर्यादेपर्यंत देखील जावेत आणि त्यात आत्मविश्वास निर्माण करणारे उपाय देखील समाविष्ट असले पाहिजेत.

सहकारी संस्था आता विशेषतः तरुण आणि महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यात खूप महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. क्षमता निर्माण, शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि आर्थिक उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग एकत्रित करणारे एक समावेशक सहकारी मॉडेल तयार आहे. महिला सक्षमीकरणाचा नारा कुठेही प्रत्यक्षात येत असेल तर तो सहकाराच्या क्षेत्रात आहे. सहकार मंत्रालयाने सहकारी क्षेत्रातील महिलांच्या उन्नती, सक्षमीकरण आणि उत्पन्न निर्मितीसाठी केलेल्या प्रयत्नांचे आता परिणाम दिसून येत आहेत. बहु-राज्य सहकारी संस्थांच्या मंडळांमध्ये महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. बहु-राज्य सहकारी संस्थांच्या मंडळांमध्ये महिला संचालकांची नियुक्ती अनिवार्य करण्यात आली आहे. यामुळे देशभरातील १,५५०हून अधिक बहु-राज्य सहकारी संस्थांच्या मंडळांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित झाले आहे. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांमध्ये (PACS) महिला सदस्यांनाही आरक्षण देण्यात आले आहे. १ लाखाहून अधिक PAC मध्ये महिलांचे प्रतिनिधित्त्व आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे. महिला सहकारी संस्थांच्या प्रकल्प, समर्थन आणि क्षमता निर्माण करण्यासाठी नंदिनी सहकार योजना नावाची आर्थिक सहाय्य योजना तयार करण्यात आली आहे. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने (NCDC) महिला सहकारी संस्थांना ५,७१४.८८ कोटी रुपयांची मदत दिली आहे आणि याचा थेट फायदा १.५ कोटींहून अधिक महिला सदस्यांना झाला आहे. एकूण, सहकार मंत्रालयाने महिलांसह सर्व सदस्यांना सक्षम करण्यासाठी प्रमुख उपक्रम हाती घेतले आहेत.

महाराष्ट्रात 'महिला सहकारी बँका' किंवा 'महिला नागरी सहकारी पतसंस्था' या माध्यमातून महिलांचे सहकार क्षेत्रातील कार्य अधिक प्रकर्षाने दिसून येते.

महाराष्ट्रातील सहकारी (सहकार) क्षेत्रातील महिला विशेष वित्तीय आणि कृषी संस्थांद्वारे वाढत्या प्रमाणात वर्चस्व गाजवत आहेत. प्रमुख खेळाडूंमध्ये माणदेशी महिला सहकारी बँक (सातारा), सेवा महिला गृह उद्योग (कोल्हापूर) आणि विविध शहरी महिला पतसंस्था यांचा समावेश आहे. प्रशासन मजबूत करणे, पारदर्शकता वाढवणे, जबाबदारी वाढवणे आणि निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करणे इत्यादींसाठी बहु-राज्य सहकारी संस्था (MSCS) (सुधारणा) कायदा आणि नियम, २०२३ अनुक्रमे ०३.०८. २०२३ आणि ०४.०८. २०२३ रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत.

सध्या गरज आहे ती शिक्षित उच्चशिक्षित महिलांनी सहकार क्षेत्रात येऊन आपले स्थान निर्माण करण्याची प्रत्येक संस्थेत उच्च पदावर अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, सल्लागार या पदांवर महिला नियुक्त झाल्यास सहकार क्षेत्राचा चमत्कारिक रित्या कायापालट व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे ८ मार्च २०२६ या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने जास्तीत जास्त महिलांनी सहकार क्षेत्रात आपले योगदान देऊन सहकारी संस्था कशा वाढवता येईल यावर मंथन केले तर महिलांचे सक्षमीकरण, आर्थिक सबलीकरण अधिक जलद गतीने करण्याचा मानस बाळगायला हरकत नाही. जय सहकार!

**– छाया ज्ञानबंधु शुक्ला**
संचालक, धरमपेठ महिला मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी नागपूर
**मोबाइल नं.– ९०२२३९९७८९, ७०२२३९९७८९**

# महिला सर्वच क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत - वैशाली आवाडे

## महिला दिनानिमित्ताने महिला मेळाव्याचे आयोजन

**शिराळा, सांगली –** महिला सर्वच क्षेत्रामध्ये आघाडीवर आहेत पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करू लागल्या आहेत, असे सहकार भारती महिला सहकारी संस्था प्रकोष्ठ अध्यक्षा वैशाली आवाडे यांनी सांगितले.

श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला मेळावा व सोने तारण कर्ज वितरण शुभारंभ प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी जिल्हा महिला समन्वयक, स्वावलंबी भारत अभियान अखिल भारतीय प्रोजेक्टच्या कल्याणी गाडगीळ होत्या. पंचायत समिती सदस्य सायली पाटील सरपंच अस्मिता पाटील यांचा सत्कार करण्यात आला. महिलांच्यासाठी पैठणी लकी ड्रॉ काढण्यात आला. सोनाली पाटील धन्वंतरी खंकाळ, पार्वती भंडारे या महिला विजेत्या झाल्या.

महिलांच्या हक्काच्या मागण्या मान्य झाल्या म्हणून जागतिक महिला दिन साजरा केला जातो. स्वतः उद्योजक बनून स्वतःच्या पायावर उभा रहा पुरुषाच्या पाठीमागे स्त्री उभी असते. त्याप्रमाणे यशस्वी स्त्रीचीही पाठीमागे पुरुष उभा असतो. स्वतःच्या जबाबदाऱ्या सांभाळून कर्तृत्त्ववान व्हा व स्वतःची ओळख व व्यक्तिमत्त्व दाखवून द्या. ज्या महिलांना उद्योग करायचा असेल त्यांनी इचलकरंजीला या सर्वतोपरी सहकार्य करू अडचण



**सागाव येथील महिला मेळाव्यात बोलताना वैशाली आवाडे. व्यासपीठावर कल्याणी गाडगीळ, सारिका मुळे, सायली पाटील, अस्मिता पाटील, संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी, अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत पाटील.**

आल्यावर त्याच्यावर मात करून उपाय शोधा. सरकारच्या भरपूर योजना आहेत त्या योजनांचा पूर्णपणे फायदा घ्या. गावातील सर्व महिला एकत्र येऊन मोठा उद्योग सुरू करा, असे त्यांनी सांगितले.

गाडगीळ म्हणाल्या, ग्रामीण भागातील स्त्री आर्थिक मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम होऊन उद्योजक बनली पाहिजे. महिलांनी एक गाव एक उद्योग सुरू करावा, यासाठी लागणारे सर्व सहकार्य करू. कोणत्याही कामाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहून महिलांनी कृतीशील राहिले पाहिजे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत चव्हाण यांचेही मनोगत झाले. संस्थेचे संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी, उपाध्यक्ष बी. टी. निकम, संचालक दिनेश हसबनीस, यशोदा बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सुरेखा मुजप्पा, सहकार भारती जिल्हा ग्रामीण प्रमुख सारिका मुळे, कोल्हापूर जिल्हा महिला प्रमुख सुषमा पाटील उपस्थित होत्या.

स्वागत व प्रास्ताविक वारणा टिंगरे यांनी केले. संस्थेची माहिती भारती खंडागळे यांनी दिली. कार्यक्रमाचे नियोजन शाखा प्रमुख सुमंत महाजन, संचालिका सुखदा महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी संचालक संजय विभुते, शाखाधिकारी दिपक साळवी, अशोक शिंदे, विनायक पाटील, महेश डोईफोडे, विनोद तिके व धनवर्धिनी प्रतिनिधी यांनी केले. सूत्रसंचालन श्वेता जाधव यांनी व आभार मुमताज संदे यांनी मानले.

# महिला दिनी पतसंस्थेतील महिला सन्मानित

**नांदेड –** जागतिक महिला दिनानिमित व्हि. पी.के. पतसंस्था कै. व्यंकटराव पाटील कवळे बिगरशेती सहकारी पतसंस्था वतीने पतसंस्थेतील महिला कर्मचारी यांचा सन्मान पतसंस्थेचे अध्यक्ष मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आला.

महिला दिनाचे औचित्य साधून पतसंस्थेच्या सर्व अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी यांची बैठक आयोजित करण्यात आली. अध्यक्ष मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी मार्च २०२६ अखेर पतसंस्थेचे उदिष्ट पूर्ण करण्यासाठी विवेचन केले. महिला कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ,



शाल व भेटवस्तू देऊन सन्मान केला.

पतसंस्थेमध्ये एकूण महिलांची संख्या १३ असून सिंधी शाखेच्या शाखाव्यवस्थापक म्हणून एक महिला कर्मचारी यांच्याकडे जबाबदारी आहे. जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमास अध्यक्ष मारोतराव पाटील कवळे गुरुजी, सचिव नागनाथ पांचाळ तांत्रिक सल्लागार उदयकुमार कुलकर्णी मुख्य कार्यकारी अधिकारी आण्णा शिंदे सरव्यवस्थापक नामदेव इंगोले, अधिकारी, कर्मचारी व महिला कर्मचारी उपस्थित होते.

# योगिराज सहकारी पतसंस्थेच्या वतीने महिलांचा सन्मान

**पुणे –** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने येथील योगिराज सहकारी पतसंस्थेच्या वतीने संस्थेतील महिला पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

नगरसेविका रोहिणी चिमटे, मयूरी कोकाटे, माजी नगरसेविका ज्योती कळमकर, स्वप्नाली सायकर उपस्थित होत्या. महिला सदस्यांना कर्ज वितरण करण्यात आले. संस्था शाखाध्यक्ष राजेंद्र मुरकुटे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गंगणे उपस्थित होते. उपाध्यक्ष राजेश विधाते यांनी आभार मानले.

यावेळी पतसंस्थेचे संचालक, पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# पीपल्स को-ऑप. बँकेच्या वतीने महिलांचा सन्मान




**पुणे –** जागतिक महिला दिन आणि पुणे पीपल्स को-ऑप. बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षनिमित्त विविध क्षेत्रातील ७५ कर्तृत्त्ववान महिलांचा सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मान करण्यात आला. स्वरूपवर्धिनी संस्थेच्या सहकार्यवाह आणि बाल व महिला विभाग प्रमुख श्रीमती पुष्पा नडे आणि समुपदेशक डॉ. स्मिता जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

बँकेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष मोहिते बँक अध्यक्ष श्रीधर गायकवाड, स्वीकृत तज्ञ संचालिका श्वेता ढमाळ यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी बँक संचालिका तसेच पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालिका वैशाली छाजेड यांनी आभार तर प्रिया निघोजकर यांनी सूत्रसंचालन केले.

# महिला दिनानिमित्ताने लेखापरीक्षण विभागातील महिलांचा सन्मान

**नागपूर –** जागतिक महिला दिनानिमित्ताने येथील विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था विभागाच्या वतीने लेखापरीक्षण विभागातील महिलांचा सन्मान करण्यात आला. जिल्हा विशेष लेखापरीक्षक विवेक पाटील, विभागीय सहनिबंधक सदानंद वुईके, लेखापरीक्षक कल्पना साठवणे व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्ष पाटील यांनी सांगितले की, महिलांनी विविध क्षेत्रात आत्मविश्वासाने पुढे येऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान द्यावे. विभागीय सहनिबंधक गणेश ठाकरे यांनी प्रास्ताविक, उपलेखा परीक्षक विनोद पारजवार यांनी सूत्रसंचालन तर उपलेखापरीक्षक जान्हवी लांभाडे यांनी आभार मानले.

# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पदभरती परीक्षा निकाल लवकरच

**पुणे –** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने पदभरती परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. एकूण ३५६ पदांसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. परीक्षेचे नियोजन एमकेसीएल एजन्सीकडून करण्यात आले होते.

बँकेच्या दैनंदिन कामकाजात अधिक गतिमानता येण्यासाठी तत्कालीन संचालक मंडळाने पदभरतीचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ३५६ जागांसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. प्रत्यक्ष निकालासाठी बराच कालावधी गेला ही परीक्षा संपली आहे. बँकेचा वार्षिक व्यवसाय हा २७ हजार कोटी इतका असून बँकेच्या २९४ शाखा कार्यरत आहेत.

समाजातील विविध घटकासाठी बँकेच्या वतीने कर्ज योजना राबविण्यात येतात.

# पराग नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी जितेंद्र बांगर

**पुणे –** पराग नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी जितेंद्र बांगर तर उपाध्यक्षपदी सचिन शाह यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाची बैठक झाली. त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विठ्ठल सूर्यवंशी यांनी काम पाहिले. जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेच्या ठेवी ५०.५० कोटी तर कर्ज ४५ कोटी इतकी आहेत. स्वनिधी १२.३५ कोटी आहे. संस्थेच्या पुणे, अहिल्यानगर, नाशिक, ठाणे छत्रपती संभाजीनगर येथे शाखा कार्यरत आहेत.

नूतन पदाधिकाऱ्यांना आगामी काळातील वाटचालीसाठी अनेकांनी प्रत्यक्ष भेटून अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या वतीने लोकोपयोगी योजना हाती घेण्यात याव्या, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# महिलांनी आत्मनिर्भर होऊन देश सक्षम आणि सबल करावा

**नवरगाव –** महिलांनी आत्मनिर्भर होऊन देश सक्षम आणि सबल होण्यासाठी हातभार लावावा, असे अश्विनी दाणी यांनी सांगितले. निवेदिता महिला क्रेडिट को-ऑप. सोसायटीच्या वतीने संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त आणि जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

संस्थेच्या अध्यक्षा सुनंदा बाकरे, उपाध्यक्ष प्रज्ञा कवासे, कार्यक्रमाच्या अध्यक्षा वैशाली वैद्य, व्यासपीठावर उपस्थित होत्या. दाणी यांनी सांगितले की, विविध क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. अर्थार्जन करीत असताना संस्कारी नागरिक घडविणे हे आपले काम आहे. याबरोबर लहान मुलांवर संस्कार करण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात वैद्य, यांनी मनोगत व्यक्त केले. वर्षा गायकवाड यांनी प्रास्ताविक तर माधुरी जोशी यांनी वैयक्तिक गीत सादर केले. सूत्रसंचालन साक्षी चुंनारकर यांनी केले.

# पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेच्या वतीने महिलांना भेटवस्तू देऊन सत्कार

**पुणे –** पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला सेवक आणि अधिकारी यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. बँकेच्या सर्व शाखांमध्ये हा उपक्रम करण्यात आला. बँकेचे संस्थापक अध्यक्ष कैलास कोद्रे आणि संचालक मंडळ यांनी उपक्रमासाठी पुढाकार घेतला.

महिला सक्षमीकरणासाठी बँकेच्या वतीने विविध योजना हाती घेण्यात आल्या आहेत. उपाध्यक्ष साहेबराव लोणकर, तसेच संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल खातेदार आणि कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केला.



लोकमान्य मल्टीपर्पज को ऑपरेटीव्ह सोसायटी विभागीय कार्यालयाचा वर्धापनदिन व महिला दिनाचे निमित्ताने कर्तृत्त्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. डॉ. किरण ठाकूर, सुशील जाधव उपस्थित होते.

# 'लोकमान्य सोसायटी'चा पुणे विभागीय कार्यालयाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

## बजाज जनरल इन्शुरन्ससोबत सामंजस्य करार

**पुणे –** 'लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या पुणे विभागीय कार्यालयाचा दहावा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापनदिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील व्यक्तींनी पुणे विभागीय कार्यालयास भेट देऊन शुभेच्छा दिल्या. वर्धापनदिनाचे औचित्य साधून लोकमान्य सोसायटीच्या वर्धापन दिनानिमित्त बजाज जनरल इन्शुरन्ससोबत सामंजस्य करार करण्यात आला.

बजाज जनरल इन्शुरन्सचे क्षेत्रीय विपणन अधिकारी श्रीपाद देऊळगावकर व विपणन अधिकारी नितीन पाटील यांची उपस्थिती होती. सोसायटीने सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्राहक, सभासदांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याअनुषंगाने विमा कंपन्यांशी करार करण्यात आल्याचे सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर यांनी सांगितले.

विभागीय मुख्यालयात व विविध शाखा कार्यालयांमध्ये शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या पुणेकरांमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, प्रसार माध्यम, वैद्यकीय, उद्योग आदी विविध क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश होता. सोसायटीतर्फे संस्थापक अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर व विभागीय प्रमुख सुशील जाधव यांनी स्वागत केले व शुभेच्छांचा स्वीकार केला.

सोसायटी' व पुणेकरांमध्ये एक ऋणानुबंध तयार झाला आहे. वित्तीय क्षेत्रात पारदर्शक व्यवहाराच्या बळावर सोसायटी पुणेकरांच्या विश्वास व पसंतीला उतरली आहे आणि म्हणूनच वर्धापनदिनी शुभेच्छांचा ओघ वाढतोच आहे, अशी प्रतिक्रिया विभागीय कार्यालयाचे प्रमुख सुशील जाधव यांनी दिली.

*** महिला दिनानिमित्ताने महिलांचा सन्मान –**

वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर व महिला दिनाच्या निमित्ताने सोसायटीच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या असामान्य महिलांचा सन्मान आयोजित करण्यात आला होता. संस्थापक अध्यक्ष डॉ. ठाकूर यांच्या हस्ते निरूपमा भावे, निकिता लोणकर, संगीता मावळे, शर्विका राऊत, नीलम एदलाबादकर, सुवर्णा दारवटकर या महिलांना पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

# सांगली अर्बन बँक मोबाइल बँकिंग सुविधा सुरू करणार

**सांगली –** सांगली अर्बन बँकेस मोबाइल बँकिंग सुविधा सुरू करण्यास आरबीआयने मान्यता दिली आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष श्रीपाद खिरे यांनी सांगितली. ते म्हणाले, ग्राहकांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी बँक प्रयत्नशील आहे.

मोबाइल बँकिंग सुविधेमुळे ग्राहकांना घरबसल्या खात्याची तपासणी, बिले भरणे, यांसह बँकेबाबतची विविध कामे करता येणार आहेत. नजीकच्या काळात बँकेला स्वत:चा आयएफएससी कोड उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

या नवीन सुविधेमुळे ग्राहकांना देखील निश्चितच फायदा होणार आहे.

# सांगली अर्बन को-ऑप बँकेचे संस्थापक कै. अण्णा गोडबोले यांना अभिवादन



**सांगली –** सांगली अर्बन बँकेचे संस्थापक कै. म. ह. तथा अण्णा गोडबोले यांच्या १२१ व्या जयंती निमित्ताने बँकेच्या प्रधान कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष गणेश गाडगीळ व संचालक यांच्या हस्ते संस्थापक कै. गोडबोले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संचालक अनंत मानवी, एच. वाय पाटील, सतीश मालू, संजय धामणगांवकर, कालिदास हरिदास, सागर फडके, मनोज कोरडे, अश्विनी आठवले, व्यवस्थापन मंडळ सदस्य अशोक सावंत, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, व्यवस्थापक वासुदेव दिवेकर, उपसरव्यवस्थापक आनंद एकबोटे, विभाग प्रमुख, अधिकारी या वेळी उपस्थित होते.




**पतसंस्था कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्रमात बोलताना विराज नाईक, संजय परमणे, प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी, प्रा. डॉ. श्रीकांत चव्हाण, सुमंत महाजन, बी. टी. निकम.**

# प्रशिक्षण हा सहकाराच्या उन्नतीचा व आकलनाचा भाग आहे - विराज नाईक

## सहकारी पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी

**शिराळा –** प्रशिक्षण हा सहकाराच्या उन्नतीचा व आकलनाचा एक भाग आहे. त्यामुळे प्रत्येक कर्मचारी, अधिकारी आणि संचालक यांनी प्रशिक्षण घ्यावे, असे आवाहन जि. प. सदस्य, विराज उद्योग समुहाचे अध्यक्ष विराज नाईक यांनी येथे केले.

पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. दत्त पतसंस्थेचे संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी, अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत चव्हाण, बी. टी. निकम, निवृत्त जिल्हा न्यायाधीश ॲड. एम. एम. पोतदार, सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य व सहकार भारतीचे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे होते.

प्रशिक्षण गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, सहकार भारती सांगली जिल्हा, श्री दत्त नागरी सह. पतसंस्था उरूण-ईश्वरपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमात लक्ष्मणराव इनामदार व भारत माता प्रतिमा पूजन व दीपप्रज्ज्वलन करण्यात आले.

स्वागत व प्रास्ताविक अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत चव्हाण यांनी केले. नाईक म्हणाले, अद्यापही अर्थिक साक्षरतेचा अभाव असल्याने सहकार प्रशिक्षण आवश्यक आहे. सुशिक्षित व्यक्तीसुद्धा ऑनलाईन फ्रॉडमध्ये फसते, हे टाळायचे असेल तर प्रशिक्षणाची नितांत गरज आहे. महाराष्ट्रात पतसंस्थेच्या माध्यमातून आर्थिक सुविधा अनेकांपर्यंत पोचवण्याचे संस्थांनी केले आहे, असे सांगून त्यांनी साखर कारखाने, सूतगिरणी, सेवा सोसायटी, बँक, बाजार समिती इत्यादी बाबतच्या कामाचा आढावा घेतला.

परमणे म्हणाले की, सहकार भारती व श्री दत्त संस्थेने प्रशिक्षण कामात सातत्य ठेवलेले आहे. पतसंस्थांनी त्यांच्या वार्षिक अहवालात सभासदाची संस्थेमुळे कशी प्रगती झाली याचे मनोगत छापले तर याचा उपयोग होईल. संस्थांनी सोशल मीडियाचा वापर योग्य पद्धतीने केला तर प्रसार व प्रचार वेगाने समाज, सभासद यांच्यापर्यंत पोहोचेल. आभार शिराळा शाखा प्रमुख सुखदा महाजन यांनी मानले.

प्रशिक्षण कार्यक्रमात कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल नागराळे यांनी कर्ज छाननी, निवृत्ती जिल्हा व सहकार न्यायाधीश ॲड. एम. एम. पोतदार यांनी सहकार कायदे, शिवाजी विद्यापीठाचे संगणक विभागाचे कबीर खराडे यांनी सायबर सिक्युरिटी व डेटा सिक्युरिटी सनदी लेखापाल सी. ए. यु. जी. डफळापूरकर यांनी पतसंस्थाना लागू असणाऱ्या आयकर कायद्यातील तरतुदी यावर मार्गदर्शन केले.

समारोप पत संस्थेचे संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी केला. प्रशिक्षण कार्यक्रमात शिराळा-वाळवा तालुक्यातील १८ पतसंस्थातील १५२ कर्मचारी,अधिकारी आणि संचालक उपस्थित होते. यावेळी सहकार भारतीचे शिराळा तालुका अध्यक्ष डॉ. पंकज पाटील, वाळावा अध्यक्ष पांडुरंग वाघमोडे, बजरंग कदम, डॉ. राजाराम पाटील, डॉ. साधना पाटील, दिनेश हसबनीस, दिलीप फल्ले उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार भारती सांगली जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली संजय विभुते, महेश कबाडे, सत्यजित झेंडे, दीपक साळवी, विश्वास साखर कारखण्याचे हिम्मत पाटील तसेच दत्त पत संस्थेने परिश्रम केले.

# श्री आर्य चाणक्य सहकारी पतसंस्थेला ५ कोटींचा नफा

**इचलकरंजी –** श्री आर्य चाणक्य सहकारी पतसंस्थेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ५ कोटीचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेच्या ठेवी २५१ कोटी तर यामध्ये २९ कोटीची वाढ झाली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र राशिनकर यांनी सांगितली.

संस्थेने १८० कोटीचे कर्ज वाटप केले असून यावेळी ३१ कोटीची वाढ झाली आहे. संस्थेने वर्षभरात ४३२ कोटीचा मिश्र व्यवसाय केला आहे आणि थकबाकीचे प्रमाण नियंत्रणात ठेवण्यात यश मिळाले आहे. संस्थेने नुकत्याच दोन नवीन शाखा सुरू केल्या आहेत. त्यामुळे एकूण शाखा ९ झाल्या आहेत. नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी मिळाली आहे, असे ते म्हणाले.




# सहकार भारती सांगली पापड महोत्सव उत्साहात साजरा

**सांगली –** सहकार भारती महानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला पापड महोत्सव उत्साहात व यशस्वी झाला. महोत्सवाचे उद्घाटन सहकार भारतीचे प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव, श्री कच्छी जैन सेवा समाजाचे अध्यक्ष सुंदर देढिया तसेच भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा स्वाती खाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

सहकार भारती प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, महानगर महामंत्री शैलेश पवार, संघटन प्रमुख संदीप कुलकर्णी, सहप्रमुख सुषमा कुलकर्णी, महानगर महिला प्रमुख उत्कर्षा लाडे, ग्रामीण संघटन प्रमुख संग्राम कुलकर्णी, महिला प्रमुख सारिका मुळे, संपदा आरवाडे, श्रुती जोशी, स्वाती सावलवाडे, अमोल बोळाज, सतीश सावंत, बाळासाहेब खुडे, अवधूत ठोके इ. उपस्थित होते.

महोत्सवात एकूण ५६ स्टॉल्स उभारण्यात आले होते. सांगली शहर व परिसरातील अनेक महिला उद्योजिकांनी घरगुती उद्योगातून तयार केलेले पापड, लोणची, मसाले व विविध खाद्यपदार्थ ठेवले होते. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उत्पादनांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महोत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार भारतीच्या महिला कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. महोत्सवासाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

# कॉसमॉस सहकारी बँक गुजरात राज्यात शाखा विस्तार करणार



**पुणे –** कॉसमॉस सहकारी बँकेने नजीकच्या काळात गुजरात राज्यात शाखा विस्तार करण्याचा निर्णय घेतला असून गांधीनगर येथे नव्याने शाखा सुरू करण्यात आली आहे. इफ्कोचे अध्यक्ष दिलीप संघांनी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याबरोबर चंगोदर आणि नवसारी शाखा सुरू करण्यात आली आहे. गुजरात राज्यात एकूण १० नवीन शाखा सुरू करण्यात आल्या आहेत.

नवीन १० शाखांमुळे गुजरातमध्ये एकूण शाखांची संख्या ३८ झाली आहे तर एकूण शाखा १९३ इतक्या झाल्या आहेत. सर्व शाखांमध्ये ग्राहकांसाठी आवश्यक त्या अत्याधुनिक सेवा सुविधा तसेच लॉकर्स आणि ठेवी योजना उपलब्ध करण्यात आल्या आहेत. बँकेचा एकूण व्यवसाय ४२ हजार कोटींपेक्षा अधिक झाला आहे. बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे, संचालक व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष मिलिंद काळे या वेळी उपस्थित होते. नजीकच्या काळात दक्षिण भारत, पश्चिम महाराष्ट्रात शाखा विस्तार करण्यात येणार आहे.

# साप्ताहिक सहकारविश्व गर्जना वाचकांच्या सेवेत

**सातारा –** सहकार विषयावर आधारित साप्ताहिक सहकारविश्व गर्जना अंकाचे प्रकाशन रा. स्व. संघाचे सातारा शहर संघचालक नितीन शिंगटे दै. प्रभातचे निवासी संपादक श्रीकांत कात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. संपादक विनायक भिसे हे उपस्थित होते.

सागर भिसे प्रमुख पाहुणे कात्रे, संघचालक शिंगटे यांनी मनोगत व्यक्त करून नवीन उपक्रमास शुभेच्छा दिल्या. माय मराठी समूहाकडून शरण्या भिसे, सुलभा भिसे, उपसंपादक सौरभ भिसे यांनी अंकासाठी शुभेच्छा दिल्या. संपादक भिसे यांनी सांगितले की, एका अर्थाने हे शिवधनुष्य आहे व या साप्ताहिकाची टॅगलाईन पत्रकारिता सहकार विश्व



गर्जना जनसेवेची आहे. सहकार विश्व माध्यमातून निश्चितपणे समाजासाठी कार्य करत राहू. सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. एक सहकार भारतीचा कार्यकर्ता म्हणून हे नाते अखेरच्या क्षणापर्यंत कायमच राहणार. विकास भिसे यांनी आभार मानले.

# सांगली अर्बन को-ऑप. बँकेस रु.१८ कोटी ढोबळ नफा व रु.२३०० कोटी व्यवसायाचा टप्पा पार

**सांगली –** सांगली अर्बन को-ऑप. बँकेने यावर्षी ९२ व्या वर्षात पदार्पण केले असून २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु. २३०० कोटी मिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला रु. १८ कोटी ढोबळ नफा झाला आहे, अशी माहिती बँकचे अध्यक्ष सी.ए. श्रीपाद खिरे यांनी सांगितली.



गणेश गाडगीळ



श्रीपाद खिरे

बँकेच्या ठेवींमध्ये रु. ११९ कोटींची वाढ होऊन एकूण ठेवी रु १३९६ कोटी झाल्या आहेत. तसेच कर्जामध्ये रु. १७२ कोटी इतकी वाढ होऊन रु. ९३२ कोटी कर्जांचे वाटप झाले आहे. बँकेचा एकूण व्यवसायात वाढ होऊन तो रु. २३२८ कोटींचा झाला आहे. बँकेच्या एनपीएमध्ये लक्षणीय घट होऊन ढोबळ एनपीए २.६७% इतका व निव्वळ एनपीएचे प्रमाण केवळ ०.७८% इतके राहिले आहे. रिझर्व बँकेच्या निकषाप्रमाणे सीआरएआरचे प्रमाण किमान १२% आवश्यक आहे, ते १४% इतके झाले आहे. बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम झाली आहे, ते म्हणाले.

बँकेस मोबाईल बँकिंग सुरु करण्यास रिझर्व बँकेकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे. त्यामुळे जून महिन्यात बँकेच्या खातेदारांना मोबाईल बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोबाईल बँकिंगमुळे बँकेचे ग्राहक घरबसल्या या सेवेद्वारे मोबाईल फोनवरून खात्याची तपासणी, बिल भरणे, पैसे ट्रान्स्फर करणे आणि इतर बँकिंग कार्ये करू शकतात.

कुसुम योजनेनंतर्गत सोलर फार्मिंग विशेष कर्ज योजनेतून तसेच सोनेगहाण व वाहन खरेदीसाठी कर्ज वाटप केल्याने कर्ज व्यवहारामध्ये वाढ झाली आहे. फ्लॅट/घर खरेदीसाठी गृह कर्ज, शेतकरी वर्गासाठी एस.यु.बी (डणइ) किसान विशेष कर्ज योजना, डॉक्टरांसाठी धन्वंतरी, तसेच फेस्टिवल कालावधीसाठी कार लोन ८.२०% आणि जीआरजे कर्ज व्याजदर ७.७५% ठेवल्याने कर्जात लक्षणीय वाढ झाली आहे. आर्थिक वर्षात केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या विविध सबसिडी स्कीम (योजनांचा) लाभ बँकेच्या कर्ज खातेदारांना झाला आहे. कर्ज योजनांचा व्यवसाय वाढीसाठी उपयोग झाला आहे.

बँकेने लाइफ इन्शुरन्स, जनरल इन्शुरन्स व हेल्थ इन्शुरन्स व्यवसायास ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. विमा व्यवसाय विभागातील कर्मचारी यांनी यासाठी विशेष योगदान दिले आहे. व्यवसाय वाढीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक, उपसरव्यवस्थापक, मार्केटिंग विभाग, अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले. बँकेच्या प्रगतीमध्ये माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापन मंडळाचे विद्यमान अध्यक्ष गणेश गाडगीळ यांचे मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष संजय पाटील व सर्व सहकारी संचालक, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांची मदत व सहकार्य मिळाले आहे. बँकेच्या आर्थिक स्थितीमुळे लाभांश देणे, शाखा विस्तार करणे आणि ग्राहकांसाठी नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त सेवा देणे शक्य होणार आहे.

# सहकारी बँकांना सामाजिक उत्तरदायित्व संकल्पना लागू करावी - विद्याधर अनास्कर

**पुणे –** सहकारी बँकांना अन्य कंपन्यांप्रमाणे को-ऑप. सामाजिक उत्तरदायित्व ही संकल्पना लागू करण्यात यावी, अशी मागणी राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे केली आहे.



याबाबतच्या निवेदनात त्यांनी नमूद केले, की देशाच्या ग्रामीण आणि अर्थनगरी अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये सहकारी संस्था आणि सहकारी बँक यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. वित्तीय सेवा समाजातील विविध घटकांपर्यंत नेण्यात सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात गेल्या काही वर्षांत सीएसआर ही संकल्पना सामाजिक विकासाचे एक प्रभावी माध्यम म्हणून मोठ्या प्रमाणावर विकसित झाली आहे. अशा प्रकारची तरतूद दि महाराष्ट्र सहकार कायद्यातील कलम ६९ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार सहकारी संस्थांना निव्वळ नफ्याच्या २० टक्के रक्कम सार्वजनिक प्रयोजनासाठी अंशदान म्हणून देता येते. या रकमेचा उपयोग हा सार्वजनिक हितासाठी आणि सहकार चळवळीच्या प्रगतीसाठी करता येणे शक्य आहे.

याबाबत आरबीआयच्या परिपत्रकानुसार सहकारी बँकांना गतवर्षीच्या निव्वळ नफ्याच्या केवळ एक टक्का इतकी रक्कम देणगी स्वरूपात देता येणे शक्य आहे पण त्याचा उपयोग सहकारी बँकांना करता येत नाही, म्हणून सहकारी बँका सीएसआरच्या चौकटीत याव्यात. यासाठी आरबीआयच्या धोरणात बदल करण्यात यावा आणि मार्गदर्शक तत्त्व तयार करण्यात यावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# श्री रवळनाथ को-ऑप. हाऊसिंग फायनान्स सोसायटीला ३ कोटी १० लाख नफा

**गडहिंग्लज –** येथील श्री रवळनाथ को-ऑप. हाऊसिंग फायनान्स सोसायटीला २५-२६ या आर्थिक वर्षात ३ कोटी १० लाख रूपयांचा निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी सांगितली.

नुकत्याचा संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेच्या एकूण ठेवी ५६६ कोटींच्या असून ९६६ कोटींचा एकूण व्यवसाय झाला आहे. वर्षभरात ठेवींमध्ये ५४ कोटींची वाढ झाली आहे. संस्थेचे एकूण सदस्य १५ हजार ८३३ असून ४०० कोटींची कर्जे वाटप करण्यात आली आहेत तर गुंतवणूक १८४ कोटींची आहे. कोल्हापूर शाखेने १०० कोटींचा ठप्प पार केला आहे. संस्थेच्या वतीने गृह, शिक्षण, गृहोपयोगी उपकरणे आदींसाठी कर्जे उपलब्ध करून दिली जातात. तसेच सर्व स्वरुपाच्या आधुनिक तंत्रज्ञान युक्त सेवा देण्यात येत आहेत.

सध्या महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये १५ शाखा कार्यरत आहेत, असे त्यांनी सांगितले.

# बँक कार्यप्रदर्शन व वार्षिक अहवाल सादरीकरण

एप्रिल महिना म्हणजे सर्व बँकांसाठी आर्थिक वर्षाच्या शेवटानंतरचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा. या काळात बँकेची आर्थिक पत्रके (Financial Statements), वार्षिक अहवाल (Annual Report) आणि संचालक मंडळासमोरील सादरीकरण (Performance Presentation) तयार केले जाते. बँकेने वर्षभर केलेले काम, त्याचे परिणाम आणि भविष्यातील दिशा – हे सर्व या माध्यमातून स्पष्ट होते.



व्यंकटेश कुळकर्णी
९४०३० ८०७५१

अनेक वेळा बँकेचे काम चांगले असते, पण त्याची मांडणी प्रभावी नसल्यामुळे चुकीचा संदेश जातो. त्यामुळे जसे आहे तसे आणि स्पष्ट सादरीकरण करणे हेच यशाचे खरे सूत्र आहे.

**• वार्षिक अहवाल व सादरीकरण का महत्त्वाचे?**

वार्षिक अहवाल हा बँकेचा आरसा असतो. Balance Sheet, Profit Loss Account, Notes to Accounts यामधून बँकेची खरी आर्थिक स्थिती दिसून येते.

❊ सभासद व ग्राहक यांचा विश्वास वाढतो

❊ नियामक (Regulator) समोर विश्वासार्हता निर्माण होते

❊ संचालक मंडळाला योग्य निर्णय घेण्यास मदत होते

**• मागील वर्षातील चुका व अपूर्ण उद्दिष्टे – पुढील वाटचाल कशी?**

❊ प्रत्येक वार्षिक अहवाल हा फक्त आकड्यांचा दस्तऐवज नसून Reflection Correction Tool असतो.

❊ मागील वर्षातील audit observations, RBI inspection remarks, internal audit findings यांचे विश्लेषण करा.

❊ अपूर्ण राहिलेले targets (उदा. NPA reduction, recovery, business growth) स्पष्टपणे नमूद करा.

❊ Action Taken Report (ATR) सादर करा.

❊ पुढील वर्षासाठी realistic व measurable targets ठेवा

**• चुका लपवू नका, त्यातून सुधारणा कशी केली हे दाखवा – हीच प्रगतीची खरी खूण आहे.**

❊ Human Resource Development - यशाची किल्ली

❊ बँकेचा खरा पाया म्हणजे तिचा कर्मचारी वर्ग (Staff).

❊ नियमित staff training programs आयोजित करा.

❊ Credit appraisal, NPA management, customer service यावर विशेष प्रशिक्षण द्या.

❊ Digital banking व cyber security awareness वाढवा

❊ Performance-based evaluation प्रणाली विकसित करा

**• Trained staff = Controlled risk + Better service + Strong bank**

❊ Compliance Culture Development – अत्यावश्यक गरज

❊ आजच्या काळात केवळ business growth पुरेसे नाही, तर compliance equally महत्त्वाचे आहे.

❊ सर्व विभागांमध्ये compliance awareness निर्माण करा.

RBI guidelines, KYC/AML norms, statutory requirements यांचे काटेकोर पालन करा.

❊ Compliance is everyone's responsibility ही संस्कृती रुजवा

❊ Compliance officer ची भूमिका अधिक प्रभावी करा.

❊ Monitoring Culture - सतत देखरेख.

❊ फक्त policy बनवून उपयोग नाही, त्यावर सतत देखरेख आवश्यक आहे.

❊ नियमित MIS reports व dashboards वापरा.

❊ शाखा स्तरावर monitoring system मजबूत करा.

❊ Early Warning Signals (EWS) ओळखण्याची प्रणाली विकसित करा.

❊ Monthly/quarterly review meetings प्रभावी करा.

**• What gets monitored, gets improved**

❊ Audit - Zero Tolerance Approach

❊ Audit हा बँकेचा Safety Mechanism आहे.

❊ Internal audit, concurrent audit, statutory audit यांना पूर्ण सहकार्य द्या.

❊ Audit observations कडे दुर्लक्ष करू नका.

❊ Repeat irregularities टाळा.

❊ Fraud prevention साठी मजबूत controls ठेवा.

**• Audit findings वर Zero Tolerance धोरण ठेवा – कोणतीही त्रुटी दुर्लक्षित करू नका.**

**• MD/CEO व संचालक मंडळाने काय करावे? (DO's)**

❊ पारदर्शकता (Transparency) राखा – आकडे स्पष्ट दाखवा

❊ अचूकता (Accuracy) सुनिश्चित करा – audited figures वापरा

❊ सातत्य (Consistency) ठेवा – year-on-year comparison सुसंगत ठेवा

❊ Key financial parameters (Deposits, Advances, NPA, Profit) स्पष्ट करा.

❊ Ratio analysis (CRAR, CD Ratio, NP- Ratio) दाखवा

❊ Risk, Challenges आणि Achievements यांचा संतुलित आढावा द्या.

❊ Internal review व board level discussion घ्या.

**• काय करू नये? (DON'Ts)**

❊ आकडे लपवणे किंवा चुकीचे सादर करणे.

❊ अतिशयोक्ती करणे.

❊ Audit remarks दुर्लक्षित करणे.

❊ Compliance कडे दुर्लक्ष करणे.

❊ Monitoring system कमकुवत ठेवणे.

**• Regulator व सभासदांसमोरील सादरीकरण –**

❊ Regulator समोर: Compliance status स्पष्ट दाखवा.
Risk management व governance मजबूत दाखवा.

❊ सभासद/ग्राहक समोर: सोप्या भाषेत माहिती द्या.
बँकेची प्रगती व स्थिरता अधोरेखित करा.

**• निष्कर्ष –** वार्षिक अहवाल हा केवळ आर्थिक माहितीचा दस्तऐवज नसून बँकेच्या विश्वासार्हतेचा पाया आहे.

**• चांगले काम + चांगली मांडणी + मजबूत compliance culture = दीर्घकालीन यश**

MD/CEO व संचालक मंडळाने पारदर्शकता, अचूकता, monitoring, audit discipline आणि staff development यावर भर दिल्यास बँक केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे तर व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही सक्षम बनेल.

एप्रिल महिन्यात तयार होणारे आर्थिक अहवाल हे बँकेच्या भविष्यासाठी दिशा ठरवणारे साधन आहे. त्यामुळे त्याकडे केवळ formal activity म्हणून नव्हे तर strategic opportunity म्हणून पाहणे हीच खरी गरज आहे.

**– व्यंकटेश कुळकर्णी, प्रशिक्षण केंद्र प्रमुख.**
**सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित पुणे.**

*****

## अमृतकार ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेला ९३ लाख ९९ हजार ३८२ रुपये नफा

**देवळा, नाशिक –** येथील रघुनाथ हरी अमृतकार ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ९३ लाख ९९ हजार ३८२ रुपये आयटीला नफा झाला असून ५६ लाख ३५ हजार रुपये निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती संस्था अध्यक्ष भारत कोठवदे यांनी सांगितली.

ते म्हणाले, मार्च अखेर संस्थेकडे २९ कोटी १८ लाख ८९ हजार २०५ रुपयांच्या ठेवी असून १७ कोटी २३ लाख ६३ हजार रुपये कर्जवाटप करण्यात आले आहे. विविध संस्थांमध्ये १० कोटी २९ लाख ५१ हजार रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेचे एकूण भाग भांडवल १ कोटी ९६ लाख ८५ हजार असून खेळते भाग भांडवल २९ कोटी ४३ लाख १७ हजार आहे. थकबाकी वसुलीचे प्रमाण ९८.५३ टक्के आहे. सीडी रेषो ६६.२ टक्के आहे. संस्थेच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत आहेत.

## आशापुरी महिला नागरी सहकारी पतसंस्थेला १६ लाख रूपयांचा नफा

**देवळा, नाशिक –** येथील आशापुरी महिला नागरी सहकारी पतसंस्थेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात १६ लाख २ हजार रूपयांचा निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती अध्यक्ष प्रियंका कोठावदे यांनी सांगितली.

मार्चअखेर संस्थेकडे ३ कोटी ११ लाख ४७ हजार रुपयांच्या ठेवी असून २ कोटी ७४ लाख ८० हजार रुपये कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच विविध वित्त संस्थेमध्ये संस्थेने १ कोटी ५३ लाख ८ हजार रुपये गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेचे खेळते भाग भांडवल ४ कोटी ३८ लाख ४४ हजार रुपये आहे तर कर्ज वसुलीचे प्रमाण ९० टक्के आहे, असे त्यांनी सांगितले. गरजू महिलाना उद्योग वाढीसाठी संस्था आर्थिक मदतीचा हात देत असते, असे त्या म्हणाल्या.

## आवाडे सहकारी बँकेला ५० कोटींपेक्षा अधिक नफा

**इचलकरंजी –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात आवाडे सहकारी बँकेला ५० कोटींपेक्षा अधिक नफा झाला आहे तर बँकेने ४८६९ कोटीचा एकूण व्यवसाय केला आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे यांनी सांगितली. नजीकच्या काळात बँकेच्या गुजरात राज्यात सूरत आणि अहमदाबाद येथे शाखा सुरू करण्यात येणार आहेत.

बँकेने एकूण कर्जाच्या ५० टक्के कर्जे ही २५ लाखांपर्यंत वाटप केली आहेत. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेची कर्नाटकातील चिककोडी येथे शाखा कार्यान्वित करण्यात आली आहे. बँकेच्या ठेवी २९७५ कोटी तर १८९४ कोटींचे कर्ज वाटप करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

## देवळा मर्चंट्स सहकारी बँकेस १ कोटी २३ लाख रुपये निव्वळ नफा

**देवळा, नाशिक –** देवळा मर्चंट्स सहकारी बँकेस नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात १ कोटी २३ लाख रुपये निव्वळ नफा झाला आहे, असे अध्यक्षा कोमल कोठावदे यांनी सांगितली. बँकेच्या एकूण ठेवी १२१ कोटी ४२ लाख असून कर्ज वाटप ८५ कोटी ५६ लाख करण्यात आले आहे. भाग भांडवल ४ कोटी ७ लाख तर एकूण निधी ३० कोटी ७२ लाख आहे. खेळते भांडवल १६१ कोटी ६६ लाख ३७ हजार असवून सीडी रेषोचे प्रमाण ७०.४६ टक्के आहे. नेट एनपीए शून्य टक्के आहे, असे त्यांनी सांगितले.


कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

व्यापारी मित्र अमृतपर्व 25 K वर्गणीदार

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

भारतात कुठेही
निश्चित अंक मिळण्यासाठी
मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com


## जळगाव जनता सहकारी बँक, सेवा भारती यांच्या विद्यमाने जलसेवा केंद्राचे उद्घाटन

**जळगाव –** जळगाव जनता सहकारी बँक व सेवा भारती देवगिरी प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने जलसेवा केंद्राचे बँकेच्या संचालिका डॉ. आरती हुजूरबाजार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने, जळगाव जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सुनील भंगाळे, संचालक सपन झुनझुनवाला, मधुकर पाटील, संचालिका संध्या देशमुख, वरिष्ठ महाव्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी, सेवाभारतीचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

## कमळ सहकारी पतसंस्थेच्या व्यवसायात वाढ

**रायगड –** जिल्ह्यातील कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचा एकूण व्यवसाय एक हजार कोटींपेक्षा अधिक झाला आहे तर एकूण ठेवी ५६० कोटी तर कर्ज २४३ कोटीची आहेत अशी माहिती अध्यक्ष नंदकुमार चाळके यांनी सांगितली. ते म्हणाले गेली ३४ वर्ष संस्था कार्यरत आहे. सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून संस्था कार्यरत असून विविध उपक्रम राबवित आहे. गरजूंना आर्थिक मदतीचा हात आणि रूग्णांसाठी सेवा उपलब्ध करण्यात येत आहे.

## श्री निनाईदेवी पतसंस्थेला पुरस्कार प्रदान

**मुंबई –** श्री निनाईदेवी सहकारी पतसंस्थेला महाबळेश्वर येथील समारंभात राज्यस्तरीय आदर्श पतसंस्था प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबईच्या राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संस्थेच्या वतीने आबासाहेब शेंडगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

# कृत्रिम बुद्धिमत्ता व पहिल्या स्तरामधील नागरी सहकारी बँका (A.I. and Tire-I UCBs)

सर्व प्रथम 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (A.I.) म्हणजे काय ? हे पाहु या ! मानवाच्या बुध्दिमत्तेसारखीच स्वतंत्र अशी बुद्धिमत्ता, तंत्रज्ञानाचे सहाय्याने निर्माण केली जाते यालाच कृत्रिम बुद्धिमत्ता (A.I.) म्हणता येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता याला इंग्रजी भाषेत Artificial Intelligence असे म्हटले जाते व त्याचे संक्षिप्त रुप (Short Form) म्हणजे A.I. होय. म्हणून व्यवहारात व बोली भाषेत A.I. म्हणण्याचा प्रघात पडलेला आहे. हे A.I. तंत्रज्ञान संगणकांना मोठ्या प्रमाणांत माहिती व आकडेवारी (Data) विश्लेषण करण्यास आणि त्यातून शिकण्यास मदत करते. तसेच हे तंत्रज्ञान संगणकांना स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यास व काम करण्यास मदत करते. साध्या सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास मशिनला बुद्धिमान बनवण्याचे तंत्रज्ञान म्हणजे A.I. होय असे मानण्यास हरकत नाही. तसेच Tire A.I. मधील नागरी सहकारी बँका म्हणजे नेमक्या कोणत्या बँका हे ही थोडक्यात पाहूया! रिझर्व्ह बंकेने नागरी सहकारी बँकावर नियंत्रणाचे हेतूने, या बँकांची चार स्तरात (Tire) विभागणी केली आहे. यापैकी पहिल्या स्तरावरील म्हणजे Tire - I मध्ये रु. १०० कोटींपर्यंत ठेवी असलेल्या नागरी सहकारी बँकांचा समावेश होतो. अशा लहान लहान नागरी सहकारी बँका नजरेसमोर ठेऊन हा लेख लिहीला असल्याने, या लेखाचे शिर्षकात A.I. बरोबरच Tire - I मधील नागरी सहकारी बँकांचा उल्लेख मुद्दामच केला आहे.

A.I. म्हणजे काय व लेखाच्या शिर्षकाचा हेतू थोडक्यात समजावून घेतल्यानंतर, A.I. चा उपयोग कोणकोणत्या क्षेत्रात प्रामुख्याने होत आहे, हे पाहूया. A.I. चा उपयोग प्रामुख्याने सुरक्षा, विज्ञान व संशोधन, शिक्षण, वित्त, कृषी, स्वास्थ्य सेवा, पर्यावरण संरक्षण, संगीत व व्हिडीओ, वाहतुक, मीडिया, ग्राहक सेवा, उद्योग व्यापार इ. क्षेत्रात A.I. चा वापर मोठ्या प्रमाणांत होत आहे. त्याचबरोबर अन्य अनेक क्षेत्रातही A.I. चा वापर केला जात आहे. माणसाच्या दैनंदिन जीवनातही, A.I. चा उपयोग केलेल्या उपकरणांच्या सेवाचा लाभ घेण्यास, सुरुवात झाली आहे. उदा. स्मार्ट फोनमधील ॲप्स, त्वरित भाषांतर करण्याची प्रक्रिया इ. आजच्या तरुण पिढीत 'अलेक्सा' हे उपकरण लोकप्रिय झाले आहे. या उपकरणास दिलेल्या आदेशानुसार माहिती पुरविते. हा A.I. चाच एक प्रकार म्हणता येईल. हळुहळू A.I. चा उपयोग माणसाच्या जीवनात विविध प्रकारे होत राहील. थोडक्यात, येणारा काळ हा A.I. चा असेल.

A.I. ची अधिक माहिती आता पाहूया! ही माहिती घेतांना त्या संदर्भातील मशिन लर्निंग, डीप लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग, A.I. अल्गोरिदम इ. सारख्या तांत्रिक व किचकट विषय बाजूला सारून सोयींसाठी A.I. चे प्रकार, ढोबळमानाने पाहूया! **अ) नॅरो** A.I. विशिष्ट कामापुरते, मर्यादित प्रमाणांत **ब) जनरल** A.I. मानवासारखे काम व विचार करण्यास सुविधा **क) सुपर इंटेलिजंट** A.I. – स्वतःचे निर्णय स्वतः घेणे व प्रसंगी मानवापेक्षाही अधिक बुद्धिमान क्षमता असलेले तंत्रज्ञान विकसित करणे. सध्या सर्वत्र दिसणारे A.I. तंत्रज्ञान हे वरील तीन प्रकारात विभागणी होऊ शकेल. वर उल्लेख केल्याप्रमाणे सर्वच क्षेत्रांत A.I. चा वापर सुरू झाला आहे. A.I. मुळे कार्यक्षमता व उत्पादकता वाढण्यास मदत होते. मानव विरहित महत्त्वाची कामे A.I. द्वारा करता येते. कामकाजात पारदर्शकता, गतिमानता, आणि सुरक्षितता A.I. मुळे शक्य होते. A.I. मदत करण्यास २४ तास उपलब्ध असतो. A.I. मुळे अनुचित व्यवहार तात्काळ निदर्शनास येऊ शकतात. अचूकता व अंदाज यासाठी A.I. ची मदत होऊ शकते. अशा प्रकारचे बरेच फायदे A.I. मुळे शक्य होतात. फायद्याबरोबरच तोट्याचाही विचार ओघाने येतोच. A.I. मुळे हळुहळू मानवी कौशल्य कमी कमी होत जाईल अशी तज्ञांना भीती वाटते. A.I. मुळे रोजगार निर्मितीवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता सातत्याने वर्तवली जात आहे. A.I. मध्ये गोपनीयता ठेवणे व सुरक्षिततेची काळजी घेणे याकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.



तसेच A.I. हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजातील नैतिकतेवरही सतत लक्ष ठेवणे गरजेचे होणार आहे. सबब A.I. मध्ये गोपनियता व सुरक्षितता याकडेही लक्ष देणे अपरिहार्य आहे. वेळोवेळी A.I. तंत्रज्ञान विकसित होत गेल्यास असे विकसित A.I. तंत्रज्ञान अंगीकारून A.I. यंत्रणा अद्ययावत ठेवावी लागते. या सर्व धोक्यांना आळा घालण्याची उपाय योजना करणे आवश्यक आहे. जसे की, सायबर सिक्युरिटीमध्ये दक्षता घेतली जाते. त्याचप्रमाणे A.I. तंत्रज्ञान प्रणालीच्या सिक्युरिटीचाही त्यात समावेश करण्याची आवश्यकता अपरिहार्य आहे.

वर सांगितल्याप्रमाणे समाजातील सर्वच क्षेत्रात A.I. चा वापर सुरू झाला आहे. त्याला बँकिंग क्षेत्र अपवाद नाही. सध्या मोठमोठ्या बँकांत A.I. चा वापर वेगवेगळ्या ठिकाणी केलेला दिसून येईल. उदा. चॅट बॉटस्, व्हर्च्युअल असिस्टंट, कर्ज मागणी मूल्यांकन व कर्ज मंजुरीचे त्वरित निर्णय, अपहार व त्यावरील उपाय योजना, जोखीम व्यवस्थापन, ग्राहक सेवा, आकडेवारी व माहिती विश्लेषण, अनुपालन (Compliance) इ. विषयात A.I. चा उपयोग करण्यास सुरूवात झाली आहे. A.I. च्या सहाय्याने जास्तीत जास्त व त्वरित सुलभ अशी सेवा ग्राहकांना कशा पद्धतीने देता येईल यावर मोठ्या बँका सातत्याने विचार करीत असतात. यात खासगी क्षेत्रातील बँका व सरकारी मालकीच्या बँका आघाडीवर आहेत. आपल्या देशातही A.I. तंत्रज्ञान क्षेत्रात Haptik, Mad-Street-Den, Kelton, Zon Corporation या सारख्या कंपन्या बँकिंग क्षेत्रात A.I. सेवा देण्यास प्रसिद्ध आहेत. भारतातील मोठ्या बँकांची संघटना, Indian Banks Association (I.B.A.) ही सुद्धा A.I. क्षेत्रात विशेष प्रगती करणाऱ्या त्यांच्या सभासद बँकांना पुरस्कार देऊ लागली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर A.I. संदर्भात नागरी सहकारी बँकामधील स्थिती कशी आहे हे पाहूया! नागरी सहकारी बँकात, काही मोठ्या बँकांचा अपवाद वगळता, A.I. मध्ये म्हणावी अशी प्रगती दिसत नाही. रिझर्व्ह बँकेच्या अलिकडील प्रसिद्ध झालेल्या A.I. संबंधीच्या एका अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये A.I.चे बऱ्या प्रमाणात उपयोग केलेल्या नागरी सहकारी बँकांची संख्या फारच कमी आहे. याच अहवालानुसार, Tire-I मधील नागरी सहकारी बँका, या तर अजूनही A.I. कडे वळलेल्या दिसत नाहीत. Tire-I म्हणजे रु. १०० कोटी ठेवी पर्यंत असलेल्या नागरी सहकारी बँका, हे आपण सुरुवातीला पाहिले आहेच. देशात १४५७ नागरी सहकारी बँका असून त्यापैकी बहुतांश म्हणजे ८३८ (५७.५२%) इतक्या नागरी सहकारी बँका Tire-I मध्ये मोडतात. आज ना उद्या या सर्वच नागरी सहकारी बँकांना,

**पुढील पानावर...**

मागील पानावरून...

# कृत्रिम बुद्धिमत्ता व पहिल्या स्तरामधील नागरी सहकारी बँका

काळाच्या ओघात, A.I. संकल्पना स्वीकारावीच लागेल. (मान्य असो वा नसो) यासाठी आत्तापासूनच A.I. चा विचार व त्याचे नियोजन इ.कडे या नागरी सहकारी बँकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

लहान नागरी सहकारी बँकांना A.I. तंत्रज्ञान कार्यान्वित करण्यासाठी मोठ्या प्रमाणांत निधीची आवश्यकता भासणार आहे. कारण या बँकांमध्ये भक्कम स्वभांडवल मोठ्या बँकांच्या तुलनेने कमी असते. ठेवीदारांचे पैसे मागताक्षणी परत द्यावे लागतात. या पैशातून अशा कारणासाठी खर्च करता येणे शक्य नाही. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. काही बँकांनी दूरदृष्टी ठेवून आपला, 'तंत्रज्ञान अद्ययावत निधी' साठविण्यास सुरुवात केली आहे. A.I. तंत्रज्ञानासाठी सुरुवातीस येणारा खर्च व पुढे त्यावरील देखभाल, घसारा इ. चा खर्च लक्षात घेता A.I. साठी पुरेशा निधीची आवश्यकता असणे अपरिहार्य आहे. परिणामतः निधीच्या वेळोवेळच्या उपलब्धतेनुसार, टप्प्याटप्प्याने A.I. मध्ये प्रगती करत जाणे, हाच मार्ग लहान नागरी बँकांना स्वीकारण्याशिवाय पर्याय राहणार नाही. केंद्र सरकारने Digital Transformation चे महत्त्व लक्षात घेऊन लहान सहकारी संस्थांना पुरेशा निधीची सहाय्यता करण्याच्या तरतुदीचा समावेश 'नव राष्ट्रीय सहकारी धोरणात' (New National Co-operation Policy) केला आहे. लहान नागरी सहकारी बँकांना A.I. प्रकल्पासाठी आर्थिक मदत / कर्ज / अनुदान इ. स्वरूपात केंद्र सरकारकडून सहाय्य मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.



लहान नागरी सहकारी बँकांना निधीबरोबरच तांत्रिक ज्ञानाचे सहाय्य मिळणेही आवश्यक आहे. त्यासाठी बँकेतील संगणक विभागातील कर्मचाऱ्यांना A.I. चे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान पाठबळ व प्रशिक्षण याचे महत्व A.I. मध्ये फार आहे. यासाठी या क्षेत्रातील कंपन्यांशी व्यवहार करतांना अतिशय काळजी घेणे आवश्यक आहे. कारण A.I. वर अतिविश्वास ठेवतांना काळजी बाळगावी असे A.I. संबंधीच्या बँकिंग क्षेत्रातील तज्ञांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर असे वाटते की, नागरी सहकारी बँकांसाठी Umbrella Organization संकल्पनेनुसार देश पातळीवर National Urban Co-operative Finance Development Corporation Ltd; ही संस्था स्थापन झाली आहे. या संस्थेकडून लहान नागरी सहकारी बँकांना A.I. उभारणीस व तंत्रज्ञान पाठबळ देण्यास, सहाय्य करण्यास मदत होईल. तसेच लहान नागरी सहकारी बँकातील कर्मचाऱ्यांना A.I. विषयी प्रशिक्षणाचीही सोय या संस्थेमार्फत केली जाईल असे अपेक्षित आहे.

बँकिंग क्षेत्रातील लहान लहान बँका व तत्सम आर्थिक संस्थांना A.I. च्या उभारणीस तांत्रिक ज्ञानाची मदत मिळावी यासाठी A.I. लॅण्डींग झोनस (AI Landing Zones) निर्माण करण्याची सूचना आर.बी.आय.ने, A.I. बाबत, नेमलेल्या समितीने केलेली आहे. A.I. Landing Zone म्हणजे अशी जागा (सुरक्षित वातावरण) जेथे लहान लहान बँकांना त्यांच्या A.I. मॉडेल्सची चाचणी घेता येईल. त्यांच्या कार्यक्षमतेचे मूल्यांकन ठरविता येईल, आवश्यक असल्यास त्यात बदल करता येईल. त्या समितीचा अहवाल माहे ऑगस्ट २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. भविष्यात या A.I. लॅण्डिंग झोन्सची मदत लहान नागरी सहकारी बँकांना घेता येईल. तसेच या समितीने A.I. संबंधीची अभ्यासपूर्वक अशी मार्गदर्शक तत्त्वे निर्देशित केली आहेत. त्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारावर A.I. तंत्रज्ञान, बँकांनी कार्यान्वित करावे अशी अपेक्षा आहे. त्याचा लाभ लहान लहान नागरी सहकारी बँकांनाही घेता येईल. या समितीचे नाव The Committee on Framework for Responsible and Ethical Enablement of A.I. (FREE- A.I.) असे आहे. डॉ. श्री. पुष्पक भट्टाचार्य, प्राध्यापक आय. आय. टी. मुंबई हे या समितीचे चेअरमन होते. ग्राहक सेवा सुधारण्यासाठी, व्यवहारातील खर्च कमी करण्यासाठी, समाजातील आर्थिक समावेशकतेस मदत करण्याचे उद्देशाने सर्वच बँकांनी A.I. तंत्रज्ञानाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. असे या समितीचे थोडक्यात मत आहे. Digital Arrest Scam संदर्भातील एका suo motu proceedings मध्ये, संशयास्पद व्यवहारावर (Suspicious Transactions) प्रभावी नियंत्रणासाठी, बँकांनी A.I.चा आधार घ्यावा अशी सूचना मा. सर्वोच्च न्यायालयानेही केलेली आहे. A.I. चे प्रमाण बँकींग क्षेत्रातही हळुहळू वाढत जाईल, परिणामत: Tire A.I. मधील नागरी सहकारी बँकांनाही A.I. कडे लक्ष केंद्रित करावे लागेल.

वरील सर्व बाबी लक्षात घेता नागरी सहकारी बँकांना काहीही झाले तरी स्पर्धात्मक जगात इतर बँकांच्या तुलनेने ग्राहकांना सुविधा देणेसाठी तसेच अंतर्गत कामकाज अचूक करणेसाठी, काळाच्या ओघात आज ना उद्या A.I. चा अवलंब करणे अपरिहार्य होईल. कळत नकळत A.I. चा मानवी जीवनावर इतका प्रभाव पडत जाईल की, नैसर्गिक बुद्धिमत्तेवर सुद्धा A.I. मात करेल की काय असा प्रश्न पडण्याची शक्यता निर्माण होईल. परिणामतः काही कालावधीनंतर माहिती तंत्रज्ञानाबरोबरच A.I. हा सुद्धा मानवी जीवनाचा एक भाग बनेल यात शंका नाही. अशा बदलाला इतर क्षेत्राप्रमाणे नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रही अपवाद असणार नाही. व्यवसाय व ठेवीच्या आकारमानानुसार, इतर बँकांचे तुलनेने, Tire - I मधील नागरी सहकारी बँका या फार लहान स्वरूपात असतात. त्यातील सर्वांनाच म्हणजे त्या बँकेच्या व्यवस्थापनास व त्यांच्या ग्राहकांना A.I. संकल्पनेची माहिती असेलच असे नाही. अशा सर्व संबंधितांना A.I. ची किमान तोंड ओळख व्हावी, या मर्यादित हेतूने हा लेख लिहिला आहे.

**- ना. रा. बोर्गीकर,**
**सल्लागार, सहकार व बँकिंग, सांगली.**
**मो. नं. - ९४२११ २८०४०**

*****

**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे**
स्थापना ४ सप्टेंबर १९१७
मुख्य कार्यालय - ४ ब, बी.जे.रोड, पुणे - ४११ ००१
फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

**✻ बँकेच्या विविध कर्ज योजना ✻**
- शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज
- वाहन कर्ज
- सोनेतारण कर्ज
- शेतीकर्ज - शासकीय अनुदानित कर्ज योजना - १०.५०%
- व्यावसायिक कॅश क्रेडिट
- ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज
- औद्योगिक कर्ज
- गृह कर्ज

**✻ बँकेच्या अत्याधुनिक सुविधा ✻**
- एनी ब्रँच बँकींग
- आरटीजीएस
- एनईएफटी
- मोबाईल बँकींग
- यूपीआय सुविधा
- ई-कॉमर्स
- लॉकर सुविधा उपलब्ध

✻ किफायतशीर व्याजदर ✻ जलद कर्ज पुरवठा ✻ सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती**
**३१/०३/२०२५ अखेर**
- ठेवी - १४७६६.८४ कोटी
- कर्जे - १२०५९.०३ कोटी
- एकूण व्यवसाय -२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**
दि. २३/०६/२०२५ पासून ठेवीवरील व्याजदरात वाढ
२ वर्षांकरिता ७.००%
(ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

**✻ विद्यमान संचालक मंडळ ✻**
मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे
अध्यक्ष
मा. सुनील काशिनाथ चांदेरे
उपाध्यक्ष
मा. अनिरुद्ध यशवंत देसाई
मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

# आयकर अधिनियम, १९६१ मधील धारा 80P: वादातून विकासाकडे - बजेट २०२६ ची दिशा

भारतात सहकारिता ही केवळ एक आर्थिक व्यवस्था नाही, ती ग्रामीण जीवनाची धडधड आहे. शेतकरी, पशुपालक, कुटीर उद्योग, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, विपणन आणि ग्रामीण कर्जपुरवठा यांसारख्या क्षेत्रांत सहकारी संस्था दशकानुदशके सामूहिक शक्ती आणि विश्वासाचे व्यासपीठ राहिल्या आहेत. याच कारणामुळे आयकर अधिनियम, १९६१ मध्ये धारा 80P सहकार क्षेत्रासाठी विशेष कर-सवलत म्हणून समाविष्ट करण्यात आली होती.




पुष्पिंदर कुमार राय
९९६८२ २००७६


मात्र कालांतराने ही धारा सवलतीपेक्षा वादाचा विषय बनत गेली. अनेक प्रत्यक्ष सहकारी संस्थांना सवलत मिळवण्यासाठी दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागले. अशा परिस्थितीत केंद्रीय बजेट २०२६-२७ सहकार क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा संदेश घेऊन आले आहे की, सरकार आता सहकारी संस्थांकडे केवळ कर-सवलत घेणाऱ्या संस्था म्हणून न पाहता, ग्रामीण विकास, MSME वाढ आणि समावेशक अर्थव्यवस्थेचा पाया म्हणून पाहू इच्छिते.

**※ धारा 80P: मूळ उद्देश काय होता?**

धारा 80P चा मूळ उद्देश असा होता की जे सहकारी संस्थांचे काम त्यांच्या सदस्यांच्या हितासाठी असते आणि नफा खासगी हातात केंद्रित न करता समाजात पुन्हा वितरित करतात, त्यांना कर-सवलत देण्यात यावी. ही तरतूद सहकारितेच्या त्या मूलभूत भावनेला बळ देते, जिथे संस्थेचा नफा शेवटी सदस्यांपर्यंत आणि ग्रामीण समाजापर्यंत पोहोचतो.

**※ धारा 80P अंतर्गत मुख्यतः खालील प्रकारच्या क्रियाकलापांवर करसवलतीची तरतूद होती:**

१) सदस्यांना कर्ज सुविधा (credit facilities)
२) सदस्यांच्या कृषी उत्पादनाचे विपणन
३) कृषी उत्पादनाची प्रक्रिया (processing)
४) दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, कुटीर उद्योग
५) इतर सहकारी संस्थांकडून मिळणारे व्याज/लाभांश

ही संकल्पना या विचारावर आधारित आहे की सहकारिता नफा नव्हे, तर सदस्य कल्याण याला प्राधान्य देते.

**※ 80P वरील वाद का वाढला?**

मागील काही वर्षांत धारा 80P संदर्भात सर्वात मोठी समस्या अशी उद्भवली की कर प्रशासनाने अनेक प्रकरणांत सहकारी संस्थांकडे संशयाच्या नजरेने पाहण्यास सुरुवात केली. त्याचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून आले:

1) 80P(2)(d) अंतर्गत व्याज/लाभांशावरील सवलत वादग्रस्त ठरली.

२) बहुस्तरीय सहकारी संरचना (federations/ apex bodies) यांना सवलतीपासून वंचित ठेवण्यात आले.

३) सहकारी संस्था विरुद्ध सहकारी बँक या ओळखीवरून वाद निर्माण झाले.

४) वास्तविक संस्थादेखील दीर्घ मूल्यांकन आणि अपील प्रक्रियेत अडकू लागल्या.

यामुळे सहकार क्षेत्राची मोठी ऊर्जा विकासाकडे न वळता न्यायालयीन प्रक्रियेत खर्च होऊ लागली.




**※ बजेट २०२६: सहकार क्षेत्रासाठी नवा संदेश**

बजेट २०२६ मध्ये सरकारने सहकार क्षेत्राला Nurture (पोषण/प्रोत्साहन) देण्याची भूमिका स्वीकारली आहे. हे बदल १ एप्रिल २०२६ पासून लागू होतील आणि करआकारणी वर्ष २०२६-२७ पासून प्रभावी ठरतील.

या सुधारणांचा मुख्य उद्देश असा आहे, सहकारी रचनेला कर-धोरणाच्या माध्यमातून बळकटी देणे, कर-गळती (tax leakage) रोखणे, बहुस्तरीय सहकारी व्यवस्थेला व्यावहारिक आधार देणे

**(१) सहकारी पुरवठा उपक्रमांचा विस्तार – पशुखाद्य आणि कापूस बियाणे समाविष्ट**

पूर्वी प्राथमिक सहकारी संस्थांना करसवलत मुख्यतः दूध, तेलबिया, फळे आणि भाज्या यांसारख्या मर्यादित उपक्रमांपुरतीच उपलब्ध होती.

बजेट २०२६ मध्ये हे मान्य करण्यात आले की प्राथमिक सहकारी संस्था आपल्या सदस्यांच्या माध्यमातून अनेक इतर महत्त्वाच्या उपक्रमांमध्येही कार्यरत आहेत. त्यामध्ये विशेषतः: A. **पशुखाद्य** (cattle feed) B. **कापूस बियाणे** (cotton seeds) यांचा समावेश करण्यात आला आहे.

या संबंधित उपक्रमांमधून होणाऱ्या नफ्यालाही आता करसवलतीच्या कक्षेत समाविष्ट करण्यात आले आहे. हा बदल ग्रामीण पुरवठा साखळी आणि पशुपालन अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

**(२) सहकारी लाभांशावर कर-तटस्थता – नव्या कर प्रणालीतही सवलत**

सहकारी रचनेचे एक वैशिष्ट्य म्हणजे लाभांशाची रक्कम अनेकदा एका सहकारी संस्थेकडून दुसऱ्याकडे आणि शेवटी सदस्यांकडे जाते. या बहुस्तरीय प्रक्रियेमुळे कर-गळतीचा (tax leakage) प्रश्न दीर्घकाळ उपस्थित राहिला आहे.

आता असे प्रस्तावित करण्यात आले आहे की इतर सहकारी संस्थांकडून मिळणाऱ्या लाभांशावर नव्या करप्रणालीत (new tax regime) देखील सवलत दिली जाईल-परंतु केवळ त्या मर्यादेपर्यंत, जितका लाभांश पुढे सदस्यांना वितरित केला जाईल.

हा बदल सहकारितेच्या सदस्य-लाभ या मूलभूत तत्त्वाला कर धोरणाद्वारे पुन्हा बळकटी देतो.

**(३) जुन्या गुंतवणुकीवर सवलत – फेडरल सहकारी संस्थांना ३ वर्षांची विशेष कर-सवलत**

सामान्यतः कंपन्यांकडून मिळणारा लाभांश सहकारी संस्थांसाठी करपात्र असतो. मात्र, बजेट २०२६ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे की Notified Federal Cooperatives ला कंपन्यांकडून मिळणाऱ्या लाभांशावर **३ वर्षांसाठी (करआकारणी वर्ष २०२८-२९ पर्यंत)** सवलत दिली जाईल, खालील अटींसह:

A. गुंतवणूक ३१-०१-२०२६ पूर्वी केलेली असावी.

B. लाभांश पुढे सदस्यांना वितरित केला जावा.

हा बदल सहकारी संस्थांच्या बॅलन्स शीटला संरक्षण देतो आणि त्यांच्या भांडवली स्थैर्याला बळकट करतो.

**(४) Multi-State Cooperative Societies Act, 2002 अंतर्गत नोंदणीकृत संस्थांना स्पष्ट मान्यता**

**पुढील पानावर...**

# दि कल्याण जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी संपदा कुलकर्णी आणि संचालक पदी रविंद्र धारणे


संपदा कुलकर्णी


रविंद्र धारणे

**पुणे** – दि कल्याण जनता सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे. बँकेच्या अध्यक्षपदी संपदा कुलकर्णी तर उपाध्यक्षपदी महेश देशपांडे यांची निवड करण्यात आली आहे. पुणे विभागातून रविंद्र धारणे, रेवा प्रभुदेसाई, सुशीलकुमार मुळे, यांची निवड झाली आहे. बँकेच्या सध्या ३९ शाखा कार्यरत असून एकूण व्यवसाय ५३०० कोटी आहे. पुण्यासह पिंपरी चिंचवड तळेगाव सातारा, कराड, कोल्हापूर या भागात बँकेच्या एकूण दहा शाखा कार्यरत आहेत.

# सहकारी पतसंस्थांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करणार - खासदार महाडीक

**कोल्हापूर** – सहकारी पतसंस्थांची चळवळ अधिक भक्कम आणि सक्षम करण्यासाठी पतसंस्थांमधील ठेवींना ५ लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळावे. तसेच युपीआय प्रणालीचा वापर करण्यात परवानगी मिळावी आणि सेवा सोसायटीना देण्यात येणारी ४० स्वरूपाची कामे पतसंस्थांना मिळावी, अशा विविध मागण्यांचा संसदेत पाठपुरावा करण्यात येईल, असे खासदार धनंजय महाडीक यांनी सांगितले.

राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सहकारी पतसंस्था महिला मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी खा. महाडीक यांचा सहकार रत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. फेडरेशनच्या राज्य महिला अध्यक्षपदी अरूंधती महाडिक यांची निवड करण्यात आली. स्वागत आणि प्रास्ताविक फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे यांनी केले. फेडरेशनच्या वाटचालीची तसेच कामकाजाची आणि आगामी काळातील आव्हाने याबाबत माहिती सांगितली.

यावेळी नूतन अध्यक्ष महाडीक यांनी मानिगत व्यक्त केले. भाजपा युवा मोर्चा प्रदेश अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कृष्णराज महाडीक यांचा सत्कार करण्यात आला.

## सन्मित्र सहकारी बँकेची ५०० कोटी व्यवसायाची उद्दिष्टपूर्ती

**पुणे** – येथील सन्मित्र सहकारी बँकेने ५०० कोटी व्यवसायाची उद्दिष्टपूर्ती नुकतीच केली आहे. बँकेचे अध्यक्ष गणेश फुलारे यांनी ही माहिती सांगितली. बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ३०८.९१ कोटी ठेवी, तर कर्ज वाटप १९५.२६ कोटी इतके केले आहे. बँकेचा निव्वळ एनपीए ०.५४ टक्के आहे. बँकेची आर्थिक स्थिति भक्कम आहे असे त्यांनी सांगितले.

## दि कोल्हापूर अर्बनला १७ कोटींपेक्षा अधिक नफा

**कोल्हापूर** – दि कोल्हापूर अर्बन बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात १७ कोटींपेक्षा अधिक नफा मिळविला आहे तर एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळविले आहे. बँक अध्यक्ष शिरीष कणेरकर यांनी ही माहिती सांगितली. ते म्हणाले, बँकेचा एकूण व्यवसाय १३८३.१६ कोटी इतका झाला असून ठेवी ९२०.९४ कोटी इतक्या झाल्या आहेत. ४६२.२२ कोटींची कर्जे देण्यात आली आहेत. बँकेचा स्वनिधी २०० कोटी आहे.

**मागील पानावरून...**

# आयकर अधिनियम, १९६१ मधील धारा 80P...

सहकारी संस्थेच्या व्याख्येमध्ये आता Multi-State Cooperative Societies Act, 2002 अंतर्गत नोंदणीकृत संस्थांचाही स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे.

या दुरुस्तीमुळे बहुराज्य सहकारी संस्थांसाठी करसंबंधी अस्पष्टता कमी होईल आणि त्यांना अधिक कायदेशीर स्थैर्य प्राप्त होईल.

**❊ ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी याचा अर्थ काय?**

धारा 80P मधील सुधारणांचा थेट अर्थ असा आहे की सहकारी संस्था अधिक सक्षम होतील. जेव्हा सहकार क्षेत्र सक्षम होते, तेव्हा त्याचा लाभ केवळ संस्थांनाच नाही, तर खालील घटकांनाही होतो:

१) शेतकऱ्यांना २) ग्रामीण रोजगाराला ३) स्थानिक MSME घटकांना ४) तसेच ग्रामीण ग्राहक बाजाराला सहकारी संस्था शेतकरी आणि बाजार यांच्यात स्थैर्याचा पूल म्हणून कार्य करतात. त्या किमतीतील चढ-उतार कमी करतात, सामूहिक सौदेबाजीची ताकद वाढवतात आणि लहान उत्पादकांना बाजारात टिकून राहण्यास मदत करतात.



**❊ धारा 80P पुढील आव्हाने** – बजेट २०२६ मधील संकेत सकारात्मक असले तरी काही आव्हाने कायम राहतील:

**❊ स्पष्टता आणि एकरूपता** – विभागीय व्याख्यांमध्ये स्थिरता आवश्यक आहे.

**❊ अनुपालन शिस्त** – सदस्य नोंदी, कागदपत्रे आणि उपक्रमांचे वर्गीकरण अधिक मजबूत करणे गरजेचे आहे.

**❊ दुरुपयोग विरुद्ध वास्तवता** – खरी सहकारिता आणि सवलतींचा गैरवापर करणाऱ्या घटकांमध्ये स्पष्ट भेद राखणे आवश्यक आहे.

**❊ निष्कर्ष: 80P – वाद नव्हे, विकासाचे साधन –**

केंद्रीय बजेट २०२६ हा स्पष्ट संदेश देतो की सरकार सहकार क्षेत्राला भारताच्या तळागाळातील अर्थव्यवस्थेचा (grassroots economy) महत्त्वाचे इंजिन मानते. या सुधारणांमधून पुढील गोष्टी अधोरेखित होतात:

१) सहकारी संस्थांना कर-धोरणाद्वारे सक्षम बनवणे.

२) कर-गळती रोखणे.

३) सहकारी लाभांशाला कर-तटस्थ बनवून सदस्य-लाभ मॉडेल मजबूत करणे.

४) बहुस्तरीय सहकारी रचनेला संरचनात्मक पाठबळ देणे.

अशा प्रकारे, धारा 80P आता केवळ करसवलतीचा विषय न राहता, ग्रामीण विकास आणि समावेशक अर्थव्यवस्थेला चालना देणारे प्रभावी साधन बनत आहे.

**जेव्हा सहकारिता मजबूत होते, तेव्हा विकास केवळ आकड्यांत नाही– तर गाव, शेतकरी आणि रोजगारात दिसून येतो.**

**– पुष्पेंद्र कुमार राय**
**राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य, सहकार भारती**
**कोषाध्यक्ष, सहकार भारती – दिल्ली**
**मोबाईल नं. : ९९६८२ २००७६**

❊❊❊❊❊

# ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’: व्यावसायिकतेचा मुखवटा

काळाची पावले ओळखून जो बदलत नाही, तो काळाच्या ओघात नामशेष होतो, ही म्हण आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानावर आधारित बँकिंग क्षेत्राला तंतोतंत लागू पडते. एकेकाळी नागरी सहकारी बँका केवळ ‘एकमेका साह्य करू’ या उदात्त तत्त्वावर आणि सामाजिक बांधिलकीवर चालत होत्या, परंतु आजच्या जागतिकीकरणाच्या आणि डिजिटल क्रांतीच्या युगात बँकिंग हे केवळ समाजकार्य उरले नसून तो एक अत्यंत गुंतागुंतीचा आणि जोखीमयुक्त व्यवसाय बनला आहे. या व्यवसायात सामान्य ठेवीदारांचा कष्टाचा पैसा गुंतलेला असतो आणि तो सुरक्षित ठेवणे ही केवळ नैतिक जबाबदारी नसून ती एक वैधानिक आणि कायदेशीर बांधीलकी आहे. याच पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (RBI) नागरी सहकारी बँकांच्या प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) ही संकल्पना अत्यंत आग्रहाने मांडली आहे.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

ऐतिहासिक संदर्भाचा विचार करता, ही ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) संकल्पना बँकिंग नियमन कायद्यात २०२० मध्ये बदल होण्यापूर्वीच आरबीआयने एका मार्गदर्शक सूचनेद्वारे आणली होती. जून २०२० मध्ये बँकिंग नियमन कायद्यात (Banking Regulation Act) जे ऐतिहासिक बदल करण्यात आले, त्याद्वारे रिझर्व्ह बँकेला आता सहकारी बँकांच्या प्रशासकीय आणि व्यावसायिक कामकाजात हस्तक्षेप करण्याचे अमर्यादित अधिकार प्राप्त झाले आहेत. सुधारित कायद्याच्या कलम १०-ए नुसार आता बँकांच्या संचालक मंडळात ५१ टक्के सदस्य हे बँकिंग, अर्थशास्त्र, कायदा किंवा कृषी यांसारख्या क्षेत्रातील तज्ज्ञ असणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, वास्तवात अनेक बँकांनी अद्याप या तांत्रिक तरतुदीची पूर्णतः अंमलबजावणी केलेली नाही. संचालक मंडळात ५१ टक्के तज्ज्ञ नेमण्याच्या अटीची पूर्तता कागदोपत्री दिसत असली, तरी प्रत्यक्षात बँकांच्या कार्यपद्धतीबद्दल आरबीआयच्या मनात अद्याप हवा तसा विश्वास निर्माण झालेला नाही. म्हणूनच, कायद्यात बदल होऊनही ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) ही संकल्पना आजही तितकीच प्रखरतेने आणि सक्तीने सुरू ठेवली आहे.

बँकिंग प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM)ची भूमिका अत्यंत उपयुक्त आणि कळीची आहे. ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) चे मुख्य कार्य बँकिंग प्रस्तावांची तांत्रिक व व्यावसायिक निकषांवर आधारित छाननी करून शिफारस करणे आहे, तर संचालक मंडळा(BoD)ने त्या शिफारसींचा विचार करून अंतिम धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित असते. जर ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) च्या तांत्रिक शिफारसीमध्ये संचालक मंडळा (BoD) ला काही बदल करायचे असतील, तर तसे सविस्तर आणि तार्किक स्पष्टीकरण इतिवृत्तात (Minutes of Meeting) नमूद करणे अनिवार्य आहे. या तरतुदीमुळे रिझर्व्ह बँकेचे (RBI) संचालक मंडळाच्या मनमानी कारभारावर एक प्रकारचे अप्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित झाले आहे. ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) सदस्यांना आरबीआयचे विशेष संरक्षण असून, त्यांच्या नियुक्तीसाठी किंवा पदावरून हटवण्यासाठी आरबीआयची पूर्वमान्यता आवश्यक असते, ज्यामुळे त्यांना स्वतंत्रपणे काम करणे शक्य होते.

परंतु, सध्या काही नागरी सहकारी बँकांमध्ये या उपयुक्त कायदेशीर संकल्पनेचा केवळ एक ‘फार्स’ केला जात असल्याचे दिसून येते. काही ठिकाणी संचालक मंडळा (BoD) ला आणि ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) च्या बैठका बेकायदेशीरपणे एकत्रित घेतल्या जातात, ज्याला कोणताही कायदेशीर आधार नाही. आरबीआयच्या ‘गव्हर्नन्स मार्गदर्शक तत्त्वानुसार, संचालक मंडळाचा अध्यक्ष हा कोणत्याही परिस्थितीत व्यवस्थापन मंडळाचा अध्यक्ष असू शकत नाही, हा नियम अत्यंत स्पष्ट आणि बंधनकारक आहे.

काही ठिकाणी प्रत्यक्ष आणि कागदोपत्री अशा दोन्ही स्तरांवर एकाच वेळी, एकाच ठिकाणी आणि एकत्रितपणे या सभा उरकल्या जातात जेव्हा या दोन्ही मंडळांच्या बैठका एकत्रित होतात आणि त्यांचे नेतृत्त्व बँकेचे अध्यक्ष (संचालक मंडळ) करतात, तेव्हा ती कृती तांत्रिकदृष्ट्या ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) च्या स्वायत्ततेवर गदा आणणारी आणि पर्यायाने त्या सभेचे संपूर्ण कामकाज व त्यातील निर्णय ‘अवैध’ (Legally Invalid) ठरवणारी असते. काही बँकांमध्ये तर हा प्रकार इतका गंभीर आहे की, काही ठिकाणी प्रत्यक्ष बैठका एकत्रित घेतल्या जातात पण केवळ कागदावर त्या वेगवेगळ्या तारखांना दाखवून प्रशासनाची दिशाभूल केली जाते. हे दोन्ही प्रकार बँकिंग नियमावलीचे उल्लंघन करणारे असून, यामुळे व्यवस्थापन मंडळाच्या स्वतंत्र अस्तित्वालाच हरताळ फासला जातो.

बँकिंगमध्ये ‘मेकर’ आणि ‘चेकर’ हे दोन भिन्न घटक असणे हे पारदर्शकतेचे पहिले सूत्र आहे. ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) चे काम हे तांत्रिक छाननी करून शिफारस करणे आहे, तर संचालक मंडळा (BoD) चे काम त्या शिफारसीवर धोरणात्मक निर्णय घेणे आहे. जर शिफारस करणारे आणि निर्णय घेणारे एकाच खोलीत, एकाच वेळी ‘हातात हात घालून’ बसले असतील, तर तिथे तांत्रिक चिकित्सा आणि निष्पक्षता शिल्लक राहत नाही. यामुळे बँकेच्या अंतर्गत नियंत्रण पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

बँकिंग प्रशासनात पारदर्शकता आणि व्यावसायिक शिस्त आणण्यासाठी ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) ची भूमिका महत्त्वाची आहे. बँकांनी केवळ औपचारिकता म्हणून नव्हे, तर ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) सदस्यांचे विशेष अनुभव आणि तांत्रिक ज्ञानाचा प्रत्यक्ष फायदा घेऊन अधिक व्यावसायिक व अचूक निर्णय घेणे आवश्यक आहे. 'बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) चे मुख्य कार्य प्रस्तावांची तांत्रिक व कायदेशीर छाननी करून योग्य शिफारस करणे आहे, तर संचालक मंडळा (BoD) चे काम त्या शिफारसींच्या आधारे अंतिम धोरणात्मक निर्णय घेणे आहे. जर बँका या तज्ज्ञ सदस्यांच्या अनुभवाचा वापर करून धोरणे आखतील, तरच जोखीम व्यवस्थापन (Risk Management) अधिक सक्षम होईल आणि बँकिंग व्यवस्थेतील विश्वासार्हता वाढेल.

येथे ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) सदस्यांनी हे विसरून चालणार नाही की, ते स्वतः या निर्णयप्रक्रियेचा एक अविभाज्य भाग आहेत. त्यांनी केवळ प्रस्तावांवर सह्या न करता, स्वतंत्र सभेचा आणि कामकाजाचा आग्रह धरला पाहिजे. आरबीआयच्या ‘गव्हर्नन्स मार्गदर्शक तत्वांनुसार, संचालक मंडळा (BoD) आणि ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) ची पदे आणि बैठका स्वतंत्र असणे बंधनकारक आहे. जर बँकांमध्ये संयुक्त बैठका घेऊन स्वायत्ततेवर गदा आणली जात असेल, तर अशा अनियमित कामकाजाबद्दल ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) सदस्यांनी आरबीआयला कळवणे आवश्यक आहे. ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) सदस्यांना आरबीआयचे विशेष कायदेशीर संरक्षण प्राप्त असल्याने त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता बँकिंग हिताचे रक्षण करणे गरजेचे आहे.

पुढील पानावर...

मागील पानावरून...

# ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’: व्यावसायिकतेचा मुखवटा

विशेष म्हणजे, ज्या संचालकांचा १० वर्षांचा वैधानिक कार्यकाळ संपला आहे, ते ‘मागील दाराने’ म्हणजेच ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) च्या माध्यमातून निर्णयप्रक्रियेत शिरकाव करून सत्तेचे केंद्रीकरण करत असल्याचे आरबीआयच्या निदर्शनास आले आहे. सत्तेचे हे केंद्रीकरण आणि हितसंबंधांच्या संघर्षातून (Conflict of Interest) निर्माण होणारी ही गंभीर प्रशासकीय अनियमितता रोखण्यासाठी तसेच ‘चेक्स अँड बॅलन्सेस’ राखण्यासाठी आरबीआयने ‘कूलिंग पिरीयड’ (Cooling Period) संदर्भातील मसुदा प्रस्तावित केला आहे यातून आरबीआयने स्पष्ट संदेश दिला आहे की, बँकेच्या अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेला छेद देणारे कोणतेही कृत्य आता सहन केले जाणार नाही.



बँकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, रिझर्व्ह बँकेकडे आता दंड आकारण्याचे, संचालक मंडळ बरखास्त करण्याचे आणि दोषी संचालकांना बँकिंग क्षेत्रापासून प्रतिबंधित करण्याचे अधिकार आहेत. कागदावर तारखांचा मेळ घालणे आणि प्रत्यक्षात सत्तेचे केंद्रीकरण करणे हा प्रकार आता आरबीआयच्या रडारवर आहे. एकत्रित बैठकीच्या धुमश्चक्रीत तांत्रिक मतभेद किंवा स्वतंत्र चर्चा कागदोपत्री येतच नाहीत, ज्यामुळे पारदर्शकता पूर्णपणे लोप पावते. जर उद्या एखाद्या बँकेत आर्थिक घोटाळा उघडकीस आला, तर रिझर्व्ह बँक सर्वात आधी हे तपासेल की, त्या प्रस्तावाची ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) कडून स्वतंत्र छाननी झाली होती का? एकत्रित बैठकांच्या चुकीच्या प्रथेमुळे अशा वेळी संपूर्ण संचालक मंडळच नव्हे तर ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) देखील कायदेशीर कचाट्यात सापडू शकते.

शेवटी, नागरी सहकारी बँकांनी हे समजून घेतले पाहिजे की सत्याला पुराव्याची गरज नसते, पण बँकिंगमध्ये प्रत्येक सत्याला कायदेशीर कागदाचा आणि स्वतंत्र प्रक्रियेचा आधार असावा लागतो. ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) आणि संचालक मंडळा (BoD) चे कामकाज पूर्णपणे स्वतंत्र, स्वायत्त आणि पारदर्शक ठेवणे ही आता निवड उरली नसून ती अनिवार्य अट आहे. रिझर्व्ह बँकेच्या बदललेल्या कायद्याची ताकद आणि त्यांच्याकडे असलेले अमर्यादित अधिकार पाहता, ज्या बँका ‘बोर्ड ऑफ मॅनेजमेंट’ (BoM) ची स्वायत्तता मान्य करणार नाहीत, त्यांना भविष्यात व्यावसायिक विस्तारासाठी आरबीआयची परवानगी मिळणे दुरापास्त होईल. वेळ निघून गेल्यावर शहाणपण सुचण्यापेक्षा, वेळेतच सावध होणे हेच आजच्या स्पर्धेच्या आणि कडक नियंत्रणाच्या युगात टिकण्याचे एकमेव सूत्र आहे. अन्यथा, आरबीआयचा ‘वज्रप्रहार’ सहन करण्याची तयारी बँकांनी ठेवावी.

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल** – nimkarganeshgmail.com

*****




# सोलापूर जनता सहकारी बँकेच्या नफ्यात गेल्या चार वर्षांत मोठी वाढ

**सोलापूर** – येथील सोलापूर जनता सहकारी बँकेच्या नफ्यात गेल्या चार वर्षांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून नफा १०० कोटीपेक्षा अधिक झाला आहे, अशी माहिती बँकेचे विद्यमान अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी सांगितली.

ते म्हणाले, सन २०२१ मध्ये बँकेचा तोटा ११ कोटी ८६ लाख रुपये होता. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत बँकेने हा तोटा भरून काढण्यात यश मिळविले असून बँकेने भरीव कामगिरी नोंदविली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे एनपीए १७.१३ टक्के होता. त्यामुळे सदस्यांना लाभांश देता आला नाही. यावर्षीचा बँकेचा निव्वळ फायदा हा २५ ते ३० कोटी इतका राहील तर एनपीए हा ०.३२ टक्के आहे. बँकेची आर्थिक स्थिती सुधारत असल्याने गेल्या काही वर्षांत बँकेने सदस्यांना लाभांश दिला आहे.

बँकेच्या ठेवी या २२० कोटी इतक्या झाल्या आहेत असे नमूद करुन ते म्हणाले, भांडवल पर्याप्तता २० टक्के पेक्षा अधिक आहे. सीडी रेषो ६० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. बँकेने तीन हजार कोटींपेक्षा अधिक मिश्र व्यवसाय केला आहे बँकेने स्वत:ची मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिली आहे आणि नजीकच्या काळात नेट बँकिंग सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.

मुख्य बाब म्हणजे बँकेचा यूपीआय प्रणालीमध्ये समावेश होणार आहे. त्यामुळे ग्राहकांना त्याचा लाभ मिळणार आहे. आर्थिक वर्षात नवीन चार शाखा सुरू करण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

# ‘सहकार स्वरूपा’ पुस्तक सहकाराचे यशस्वी मॉडेल -डॉ. उदय निरगुडकर

**रत्नागिरी –** सहकार क्षेत्रातील समस्या आणि त्यावर काढलेले मार्ग यांचा अनुभवसिद्ध ऊहापोह सहकार स्वरूपा पुस्तकात असल्याने हे एक आदर्श ‘टेक्स्टबुक’ ठरू शकते, असे ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी सांगितले.

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था व रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालयाचे अध्यक्ष दीपक पटवर्धन लिखित ‘सहकार स्वरूपा’ या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष संतोष थेराडे, आकाशवाणीचे निवृत्त अधिकारी सुहास विद्वांस, पतसंस्थेचे उपाध्यक्ष माधव गोगटे, रत्नागिरी (जिल्हा) नगर वाचनालयाचे उपाध्यक्ष संतोष प्रभू उपस्थित होते.

**※ पुस्तक विविध भाषांमध्ये अनुवादित व्हावे –**

‘सहकार स्वरूपा’ या आत्मचरित्रात्मक पुस्तकात पटवर्धन यांच्या ३५ वर्षांच्या संघर्षमय जीवन प्रवासाची कहाणी आहे, असे नमूद करून ते म्हणाले, सहकार क्षेत्रातील समस्या आणि त्यावर काढलेले मार्ग यांचा ऊहापोह पुस्तकात असल्याने हे एक आदर्श ‘टेक्स्टबुक’ ठरू शकते. खरा अंत्योदय सहकारातूनच होऊ शकतो. त्यामुळे हे पुस्तक विविध भारतीय भाषांमध्ये अनुवादित व्हावे. मुंबईत स्वप्न घेऊन जाणाऱ्या युवकांनी कोकणात राहून कार्य करण्यासाठी हे पुस्तक रोल मॉडेल ठरावे. सहकार क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी पुस्तक प्रॅक्टिकल मार्गदर्शक ठरेल. अभ्यासक्रमाबाहेरील अनेक विषय यात मांडले आहेत. नीतिमान माणसे कशी गोळा करावीत आणि त्यांना केवळ पगार देऊन नव्हे तर संस्थेशी बांधील ठेवून कसे टिकवून ठेवावे, याचे मार्गदर्शन यात आहे, असे त्यांनी सांगितले.

**※ सहकार म्हणजे ‘स्वाहाकार’ नव्हे –**

सहकार म्हणजे ‘स्वाहाकार’ नव्हे. अनेकदा अंधारात लढावे लागते; मात्र या प्रवासात पटवर्धन यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या पत्नी अरुणाताई यांनी दिलेली साथही तितकीच मोलाची असल्याचे डॉ. निरगुडकर यांनी आवर्जून नमूद केले. संतोष थेराडे यांनी पटवर्धन यांच्या संस्थात्मक



कार्याचा आढावा घेऊन डॉ. निरगुडकर यांचा परिचय करून दिला.

अंकिता वैभव पटवर्धन यांनी सांगितले, की बाबांच्या आत्मकथनाचा हा सोहळा अभिमानाचा क्षण आहे. संघर्षातून यश मिळवत इतरांना प्रेरणा देणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व मार्गदर्शक ठरेल. विद्वांस म्हणाले, पतसंस्थेचा केवळ दहा हजार रुपयांपासून सुरू झालेला प्रवास आज सातशे कोटींपर्यंत पोहोचला आहे. कोकणात सहकाराची पायाभरणी करणारे पटवर्धन दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व आहे.

**※ युवकांनी सहकाराकडे नव्या दृष्टीने पाहावे –**

पुस्तकाबद्दल बोलताना पटवर्धन म्हणाले, सहकार व समाजजीवनातील ३५ वर्षांचा प्रवास पुस्तकातून शब्दबद्ध झाला आहे. व्हॉट्सॲपवरून संस्थात्मक लेखन करत असताना मित्रांनी पुस्तक लिहिण्याचा आग्रह धरला. त्यातूनच हे पुस्तक साकार झाले. दहा हजार रुपयांच्या भांडवलातून सुरू झालेल्या प्रवासाने सातशे कोटींचा टप्पा गाठला आहे. ३०० सभासदांपासून सुरू झालेली संस्था आज ४९ हजार सभासदांपर्यंत पोहोचली आहे. सहकार क्षेत्रात मोठ्या संधी असून उद्योजकतेसाठी व्यापक नेटवर्क उपलब्ध आहे. कोकणातील युवकांनी सहकाराकडे नव्या दृष्टीने पाहावे, असे आवाहन त्यांनी केले. आईवडील यांचा आधार यामुळेच आयुष्यात अनेक संस्थांमध्ये अढळ स्थान मिळवता आले, असेही पटवर्धन यांनी सांगितले. पूर्वा पेठे यांनी सूत्रसंचालन केले.

## सहकारी संस्थांची नोंदणी ऑनलाईन होणार

**पुणे –** राज्यात सर्व सहकारी संस्थांची नोंदणी आता आपले सरकार पोर्टलवरुन ऑनलाइन पद्धतीने करावी लागणार आहे, असे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी स्पष्ट केले आहे.

देशात महाराष्ट्र सहकार क्षेत्रात आघाडीवर असून सध्या २ लाखापेक्षा अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत. या नवीन पोर्टल वर सर्व प्रकारच्या नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व प्रकारचे अर्ज ऑनलाइन उपलब्ध करण्यात आले आहेत. या स्वरुपाच्या सूचना राज्यातील सर्व सहकारी संस्थांना देण्यात आल्या आहेत. ऑनलाइन नोंदणीमुळे फायदा होणार आहे. ऑनलाइन नोंदणीमुळे मानवी हस्तक्षेप होणार नाही. तसेच सर्वसामान्यांना होणारा त्रास कमी होणार आहे आणि ऑनलाइनमुळे वेळेची बचत होणार आहे.

## पतसंस्थांच्या थकित कर्ज वसुलीसाठी स्वतंत्र निबंधक नेमण्याची मागणी

### जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे सहकार मंत्र्यांना साकडे

**सोलापूर –** सोलापूर जिल्ह्यातील अकराशेहून अधिक सहकारी पतसंस्थांच्या थकित कर्ज वसुलीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र सहाय्यक निबंधक पदाची निर्मिती करावी, अशी मागणी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनने केली आहे. फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पतंगे व उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी यांनी राज्याचे सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांना लेखी निवेदन दिले आहे.



जिल्ह्यात सध्या जवळपास ११०० पतसंस्था कार्यरत असून त्या ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा करतात. गेल्या काही वर्षांत कर्ज वसुली मंदावल्याने अनेक संस्थांच्या आर्थिक स्थैर्याला धक्का लागला आहे. सहकार कायद्यातील कलम १०१ नुसार वसुली दाखले मिळवण्यासाठी सध्याच्या निबंधक कार्यालयावर कामाचा मोठा ताण आहे. कर्मचारी संख्या अपुरी असल्याने दाखले मिळण्यास विलंब होतो. परिणामी पतसंस्थांचा एन.पी.ए. वाढत असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

इतर जिल्ह्यांमधील पतसंस्था फेडरेशनच्या धर्तीवर सोलापूर जिल्हा स्तरावरही कलम १०१ची प्रकरणे चालवण्यासाठी ‘सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनसाठी’ स्वतंत्र सहायक निबंधक किंवा सहकारी अधिकारी (परसेवा) या पदाची निर्मिती करावी, जेणेकरून वसुलीची प्रक्रिया कायदेशीर व निकोप होईल. यामुळे ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहण्यास मदत होईल, असा विश्वास निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे.

# सहकारी संस्थांना निधी व्यवस्थापनाचे ज्ञान आवश्यक -जिल्हाध्यक्ष नारखेडे



**फैजपूर –** सहकारी संस्थानचे निधी सुरक्षित ठिकाणी गुंतवणूक करणे गरजेची असून त्यासाठी अद्ययावत माहिती संस्था चालकांना असणे आवश्यक असल्याचे मत सहकार भारती जिल्हा अध्यक्ष नरेंद्र नारखेडे यांनी व्यक्त केले.

फैजपूर शहर सह यावल व रावेर तालुक्यातील सहकारी पतसंस्था संचालक व कर्मचारी यांचे प्रशिक्षण शिबिर झाले. अध्यक्षीय भाषणात नारखेडे यांनी पतसंस्थाकडे असलेला निधी मान्यताप्राप्त लेखा परीक्षण वर्ग एक असलेल्या विविध बँक मध्येच सुरक्षितता तपासून गुंतवणूक करावी. कर्ज अदा करताना मालमत्तेचे वर्गीकरण तपासणे व व्यवसायिक उत्पन्न स्रोत बघणे हेसुध्दा गरजेचे असल्याचे सांगितले.

बळवंत पतसंस्था कार्यकारी संचालक जयदीप शहा यांनी सहकार विभागाचे नवीन परिपत्रक व कर्ज वाटप धोरण नवीन संधी याबाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन जळगाव जिल्हा सहकार भारतीने केले होते. प्रशिक्षण कार्यक्रम सहकार भारतीचे प्रशिक्षण केंद्र साताराचे प्रमुख संजय बिर्ला यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

सहकार भारती जिल्हा अध्यक्ष नरेंद्र नारखेडे, महामंत्री शशिकांत बेहडे, तालुका अध्यक्ष महेश गडे, कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर चौधरी, दूध संघ संचालक नितीन चौधरी, हेमराज चौधरी, उपाध्यक्ष मनोजकुमार पाटील, संचालक अनिल नारखेडे, अप्पा भालचंद्र चौधरी, सुनील वाढे, गणेश चौधरी यांसह पतसंस्था पदाधिकारी व संचालक उपस्थित होते. सूत्रसंचालन शशिकांत बेहडे यांनी नियोजन सातपुडा व्यवस्थापक काशीनाथ वारके, लक्ष्मी नागरी पतसंस्था व्यवस्थापक जयश्री चौधरी, राजेंद्र मानेकर, विलास तायडे, किशोर नेहते, गौरव नारखेडे यांनी परिश्रम घेतले.

# केशव नागरी सहकारी पतसंस्थेचा ३४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

यवतमाळ – केशव नागरी सहकारी पतसंस्थेचा ३४ वा वर्धापन दिन संस्थेच्या वणी मुख्यालय येथे झाला. संस्थेच्या अध्यक्ष चंद्रशेखर खोंड, उपाध्यक्ष दौलत वाघमारे, मानद सचिव अनिल आक्केवार यांचे हस्ते डॉ. हेडगेवार गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

वणी शहरात दि. २७ मार्च १९९२ रोजी संघस्वयंसेवक आणि सहकार भारती यांच्या पुढाकाराने केशव नागरी सहकारी पतसंस्था सुरू झाली. वणी येथे मुख्यालय आणि आर्णी घाटंजी पांढरकवडा यवतमाळ येथे शाखा कार्यरत आहेत. संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी दीपक दिकुंडवार यांनी संस्थेचा आलेख मांडला. मानद सचिव अनिल आक्केवार यांनी अनुभव सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक दिकुंडवार यांनी अडचणी आणि केलेला संघर्ष विशद केला. आभार विभागीय वसुली अधिकारी कवडू पिंपळकर तर संचालन घाटंजी शाखा व्यवस्थापक उदय कुळकर्णी यांनी केले.


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या;
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. उदय पेंडसे (संचालक) – ९८६९० ३४६६२**

✱ **प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ **ई–मेल –** sahakarprashikshan@gmail.com

# ‘जॉब रोटेशन’ प्रणाली आरबीआय नियमानुसार हवी




**डॉ. अभय मंडलिक**
९४०३० ८०७२५


बँकिंगमध्ये जॉब रोटेशनबाबत रिझर्व बँक ऑफ इंडियाची आणि सीव्हिसीची मार्गदर्शक तत्त्वे आहेत, ज्याचे बँकांनी पालन करणे अपेक्षित आहे.

**※ जॉब रोटेशनचे महत्व आणि नियम –**

लिपिक पातळीवर दर सहा महिन्यांनी त्याचे काउंटर किंवा त्याचे काम यात बदल केला पाहिजे. या प्रकारच्या बदलामुळे कामकाजातील जोखीम कमी होते. गुंतवणूक कर्ज व्यवहार, रोखीचे व्यवहार, परकीय चलनाचे व्यवहार या प्रकारच्या जोखमीच्या कामांमध्ये ठराविक अंतराने बदल करणे आवश्यक असते. एकच व्यक्ती तेच काम सातत्याने करीत असल्यास गैरप्रकार होण्याचा धोका संभवतो. रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे जॉब रोटेशन हे नियमितपणे झालेच पाहिजे.

जॉब रोटेशनमुळे सर्व कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारच्या कामांची माहिती होते. व्यक्तिगतरीत्या पदोन्नतीसाठी या गोष्टींचा निश्चितपणे फायदा होतो. गेल्या काही वर्षांत बँकिंगच्या कक्षा मोठ्या प्रमाणात रुंदावल्यामुळे काम करणाऱ्या प्रत्येकाला कामाच्या स्वरूपाची माहिती होण्याच्या दृष्टीने जॉब रोटेशन अत्यावश्यक आहे. कर्मचारी वर्गाच्या दृष्टीने विचार केल्यास एकाच प्रकारचे काम करीत राहिल्यास त्याप्रकारच्या कामाचा कंटाळा येणे नैसर्गिक आहे. कामाची गती मंदावते, कार्यक्षमता कमी होते. याउलट दर सहा महिन्यानंतर कामात बदल झाल्यास शिकण्याचा उत्साह टिकून राहतो, कर्मचारी वर्गाची कार्यक्षमता वाढते.



सेंट्रल व्हिजिलन्स कमिशनने याबाबतीत स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. या सूचनांचे पालन करणे बँकांवर बंधनकारक आहे. बँकांच्या रिझर्व बँक तपासणीमध्ये जॉब रोटेशन प्रत्यक्ष झाले आहे की नाही याची रिझर्व बँकेकडून माहिती घेतली जाते. शाखा पातळीवरील कामकाजाचा विचार केल्यास सर्व कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारचे काम अवगत असल्यास परिचलन सोप्या पद्धतीने करता येईल. नागरी सहकारी बँकात जॉब रोटेशनबाबत पुरेशी काळजी घेणे आवश्यक आहे. अनेकदा केवळ कागदोपत्री जॉब रोटेशन दाखविले जाते, प्रत्यक्षात तसे केले जात नाही. यामध्ये फार मोठा धोका आहे. जॉब रोटेशन न करण्यामागे एखादा कर्मचारी त्या कामास पुरेसा सेट झाला आहे, या प्रकारचे कारण देण्यात येते. तपासणाऱ्या अधिकारी, शाखाधिकारी याला कमीत कमी त्रास व्हावा यासाठी जॉब रोटेशन टाळले जाते. यात गैरप्रकारची फार मोठी शक्यता असते. कोणताही गैरप्रकार घडल्यास त्यातून निर्माण होणारे प्रश्न अत्यंत गंभीर असतात. बरेचदा नोकरी गमावण्याची ही भीती असते.

या पार्श्वभूमीवर जॉब रोटेशनकडे पुरेशा गांभीर्याने बघितले जावे. कर्मचारी वर्गाला सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिलेले असल्यास जॉब रोटेशन सहजासहजी करता येऊ शकते. लहान किंवा कमी व्यवसाय असलेल्या शाखांमध्ये कर्मचारी वर्गाला अन्य काउंटरचे काम प्रसंगोपात्त दिल्यास त्यांना अनुभव येतो आणि कामाच्या बदलाची सवय होते. शाखाधिकारी, अधिकारी यांनी याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**※ अधिकारी, वरिष्ठ अधिकारी यांचे जॉब रोटेशन –**

अधिकारी आणि शाखाधिकारी एका शाखेत किंवा एका विभागात तीन वर्षापेक्षा अधिक काळ नसावेत अशी मार्गदर्शक तत्वे आहेत. त्यामुळे अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या नियमितपणे, शक्यतोवर तीन वर्षानंतर बदल्या झाल्याच पाहिजेत. वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांच्या देखील ठराविक काळानंतर बदल्या कराव्यात अशा मार्गदर्शक सूचना आहेत. जोखमीच्या विभागात काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दहा दिवसांसाठी पगारी रजा देण्याबाबतही सूचना आहेत. कार्यभार नजीकच्या सहकार्याकडे सोपवला पाहिजे अशाही सूचना आहेत. बँकेसारख्या संस्थेत फक्त एकाच व्यक्तीला ठराविक प्रकारचे काम येते आहे, इतरांना त्याची माहिती नाही ही स्थिती अपेक्षित नाही. नागरी सहकारी बँकांतून हा अनुभव नेहमी येतो. यासाठी विविध विभागांसाठी करियर प्लान तयार करून अधिकारी वर्गाची दुसरी फळी तयार करणे आवश्यक असते.

कार्यक्षम वरिष्ठ अधिकारी कामाची परिपूर्ण माहिती इतरांना देण्यास फारसे तयार नसतात, त्यांचे महत्त्व कमी होईल अशी त्यांना भीती असते. हे टाळण्यासाठी मनुष्यबळ विकासाची दीर्घकालीन योजना सर्व विभागांसाठी तयार करून ती अमलात आणली पाहिजे. वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांच्या देखील बदल्या झाल्या पाहिजेत.

बँकेच्या वरिष्ठ फळीतील अधिकाऱ्यांना प्रत्येक विभागाचे कामकाज कसे चालते याचे ज्ञान असणे आवश्यकच आहे. कोणत्याही विभागामध्ये ठराविक लोकांची एकाधिकारशाही असणे बँकेच्या हिताचे नसते. मनुष्यबळ विकास विभागाने हुशार कर्मचारी, अधिकारी यांच्याकडे लक्ष ठेवून त्यांना योग्य ती संधी दिल्यास समन्वयाने काम चालू शकते. अर्थात नियोजन आणि त्याची अंमलबजावणी याची गरज असते.

कोणत्या जागी कोणत्या व्यक्तीला आणावे, याचा निर्णय प्रशासन आणि मनुष्यबळ विभागाने घेतला पाहिजे संचालक मंडळाची यामध्ये ढवळाढवळ अपेक्षित नाही.

**※ अंमलबजावणी –** लिपिक श्रेणीपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत जॉब रोटेशन व्यवस्थित होते आहे की नाही याकडे संचालक मंडळानेही लक्ष दिले पाहिजे. सहामाही, वार्षिक अहवाल संचालक मंडळ पुढे येईल अशी व्यवस्था असावी. जॉब रोटेशन हे रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे, सीव्हीसीच्या नियमाप्रमाणे आवश्यक आहे, याची गांभीर्याने नोंद घेतली पाहिजे.


**– डॉ. अभय मंडलिक**

**– लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.**


*****

## एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यवतमाळ अर्बनला यश

**यवतमाळ –** यवतमाळ अर्बन बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात नेत्रदीपक कामगिरी नोंदवित एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळविले आहे. बँकेने ३१.७५ कोटीचा व्यवसाय केला असून २०.१४ कोटींचा नफा मिळविला आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे यांनी सांगितली.

आगामी काळात ग्राहकांना सर्व स्वरुपाच्या ऑनलाईन सेवा देण्याचा मानस आहे, असे नमूद करून ते म्हणाले, त्यासाठी आवश्यक ती तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

तसेच बँकेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या विविध योजनांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. बँकेकडे सध्या १९०० कोटी ठेवी असल्याचे त्यांनी सांगितले.

THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL

# दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि.,यवतमाळ

मुख्य कार्यालय : एल.आय.सी.चौक, मार्डन रोड, यवतमाळ ४४५००१ फोन : ०७२३२-२४४२४१, २४३७०३, २३४४४२
web:www.yavatmalurban.bank.in e-mail:ho_adm@yavatmalurban.bank.in

आम्ही जपतो वारसा विश्वासाचा



# सुख समृद्धी ठेव योजना



## योजनेची वैशिष्टे

- 8% चक्रवाढ व्याजदर
- 15 महिन्यांचा कालावधी
- सुरक्षित गुंतवणूक

**20 मार्च ते 15 एप्रिल 2026**

आजच गुंतवा आणि
आपले भविष्य सुरक्षित करा !

### कोण गुंतवणूक करू शकतं ?

» वैयक्तिक खातेदार : किमान ठेव रु. 5,00,000/- व त्याच्या वर

» संस्था / ट्रस्ट : किमान ठेव रु. 25,00,000/- व त्याच्या वर

**आजच आपल्या जवळच्या शाखेत भेट द्या**

स्किम :- वैयक्तिक ठेवीकरीता RISUKGEN
पतसंस्था/ट्रस्ट ई. करीता RISUKSOC

डॉ. नितीन खर्चे, अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला, उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे, मुख्य कार्यकारी अधिकारी

- संचालक -

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | अ‍ॅड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून–
**वार्षिक रु. ७००/– त्रैवार्षिक रु. १८००/–**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**


/chandrapururban
चंद्रपूर अर्बन मल्टीस्टेट
स्वप्नपूर्तीची नवी दिशा,
हीच आमची ध्येयपूर्तीची परंपरा!
मासिक ठेव योजना
निवृत्तीनंतर मिळवा दरमहा लाभदायी रक्कम घरबसल्या
मुदत ठेव योजना
ठराविक दिवसांच्या लाभदायी गुंतवणुकीवर करा भविष्य सुरक्षित
अधिक माहितीसाठी आजच जवळच्या शाखेस संपर्क साधा.
20+ शाखा • 500000+ समाधानी ग्राहक
चंद्रपूर अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., चंद्रपूर
मुख्य कार्यालय : सदाशिव चेंबर्स, अभय टॉकीज जवळ, बालवीर वॉर्ड, चंद्रपूर 442401. (Regd. No.MSCS/CR/1123/2014)
91453 93333 / 07172 259116
chandrapururbanho@gmail.com
www.chandrapururban.com



स्वत:च्या कुटुंबासाठी हवे

**स्वत:चे घर,**

ठेवा विश्वास जनसेवेच्या

**'घरकुल' कर्जावर !**

# जनसेवा घरकुल कर्ज

रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)

* अटी लागू

- आकर्षक व्याजदर
- तत्पर सेवा
- अल्प प्रोसेसिंग फी
- रु. 2 कोटींपर्यंत कर्ज

**संपर्क क्र. - 84 85 87 12 52**

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.

Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur

We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,

# बँकेकडील विविध सबसिडी योजना

1 PMEGP Prime Minister's Employment Generation Programme
प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना
PMEGP

2 PMAY - Pradhan Mantri Awas Yojna - Urban २.०
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०
Pradhan Mantri Awas Yojana - Urban 2.0

3 PMFME Pradhan Mantri Formalisation of Micro Food Processing Enterprises
प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना

4 PM-KUSUM (Pradhan Mantri Kisan Urja Suraksha Evam Utthan Mahabhiyan)
प्रधानमंत्री मंत्री किसान उर्जा सुरक्षा एवंम उथ्थान महाभियान
PM KUSUM Scheme

5 PM - SURYA GHAR MUFT BIJLI YOJANA
पी.एम. - सुर्यघर मोफत विज योजना

6 CLCSS Credit Linked Capital Subsidy Scheme

7 APAMVM- Annasaheb Patil Aarthik Magas Vikas Mahamandal
आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

8 AIF - National Agriculture Infra Financing Facility
राष्ट्रीय कृषी पायाभूत वित्तपुरवठा सुविधा (नाबार्ड पुरस्कृत)

9 NLM National Livestock Mission
राष्ट्रीय पशुधन अभियान

10 NABARD Interest Subvention Scheme
NABARD

11 CGTMSE (सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट)
cgtmse

12 महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)
ACADEMY OF MAHARSHTRA RESEARCH, UPLIFTMENT AND TRAINING (AMRUT)
AMRUT

Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास

## सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८

मोबाईल : ७८८८००९७१८

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.



## सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2026 बँक / पतसंस्था दैनंदिनी

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश

देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...

नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६

किंमत रु. 500/-
अधिक प्रतींसाठी विशेष सवलत
आजच नोंदणी करा!

किंमत रु. 400/-
अधिक प्रतींसाठी विशेष सवलत
आजच नोंदणी करा!

नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६

सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com


50+ YEARS OF MOMENTUM
CAR LOAN
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
Turn the steering wheel towards your dream car
and let smart financing lead the way.
Minimal Processing Fees & Quick Disbursement*
* T&C APPLY
अर्थ सहकारेण कल्याणम्
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/04/2026) Posting on 07/04/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

